# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००८ |
| वर्ष | : | नववे |
| अंक | : | ३ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १२७**

MAHMARI 19358/13/1/2000 - TC



विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.
# दिशा

वर्ष नववे / अंक ३ / मार्च २००८

## संपादकीय
## भाषाभिवृद्धी आणि मनोदास्य

भाषा बोलणाऱ्या, लिहिणाऱ्या आणि त्या भाषेच्या माध्यमातून जीवन व्यवहार करणाऱ्या समाजातील माणसांवर अवलंबून असते. त्यामुळे समाजाचा विकास आणि भाषेचा विकास या समांतर प्रक्रिया आहेत. भाषेचा विकास म्हणजेच संस्कृतीचा विकास, हे लक्षात घेता भाषा वापरातील समाजाच्या मानसिकतेला असलेले महत्त्व जाणवते. एकजिनसी समाजाचे स्वप्न प्रत्यक्षात आणायचे असेल तर, मातृभाषा या एकाच माध्यमातून संस्कार करण्याची क्षमता असणारे शिक्षण दिले जायला हवे. त्यासाठी जनसामान्यांची मातृभाषा ही शिक्षणाची भाषा व्हायला हवी. मराठी ही समृद्ध आणि संस्कृतोद्भव भाषा असल्याने परिभाषा निर्माण करण्याची तिची अंगभूत क्षमता मोठी आहे. असे असताना पाश्चात्त्य शब्दांचा अनावश्यक वापर करण्याच्या आजच्या पार्श्वभूमीवर मराठीच्या वापराबाबत सकारात्मक पार्श्वभूमिवर मानसिकता निर्माण व्हावयास हवी.


ज्ञान आणि विज्ञानाच्या क्षेत्रातील मूलभूत संशोधन ज्या भाषेत होते ती ज्ञानभाषा बनते. आजचे आमचे भाषिक व्यवहार याला सुसंगत नाहीत. स्वातंत्र्यवीर सावरकारांनी १९३७ साली या प्रकारास 'मनोदास्य' असा चपखल शब्द वापरला होता. या संदर्भात साहित्य संमेलनांच्या व्यासपीठांवरून वेळोवेळी व्यक्त झालेले विचार महत्त्वाचे आहेत. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी १९४६ साली (३० वे साहित्य संमेलन, बेळगाव) मांडलेला विचार अधोरेखित करायला हवा. महाराष्ट्राच्या जीवनाच्या सगळ्या कक्षा साहित्याने व्यापल्या तर मराठीची प्रतिष्ठा आणि प्रभाव वाढेल, असा तो विचार होता.

भाषाभिसरणातून संस्कृतीची वाढ होण्याऐवजी आज परभाषांतील शब्दांचा अनावश्यक वापर करण्याचे समर्थन केले जाते. वृत्तपत्रे आणि अंतरजाल (इंटरनेट) सारखी माध्यमे या भाषा प्रदूषणात अग्रेसर आहेत. मातृभाषेचे सामर्थ्य इतके अमोघ आहे की, ती सुप्तांना जागृत करते, उदासीनांना कार्यप्रवण करते आणि दुरावा मिटवून आपुलकी निर्माण करते. एकच मातृभाषा असणाऱ्या दोन व्यक्ती वेगळ्या भौगोलिक क्षेत्रात, सांस्कृतिक वातावरणात भेटतात तेव्हा त्यांच्यातील आपुलकीची भावना हे याचे उदाहरण म्हणून लक्षात घेण्यासारखे आहे. त्या त्या भाषेतील साहित्य सांस्कृतिक परंपरा जोपासते. सांस्कृतिक विकास ही भाषासापेक्ष संकल्पना असते. असे असताना इंग्रजीचे भाषिक गुलामगिरीचे जोखड आजही आमच्या मनावर आहे, हे न्यूनगंडाचे लक्षण आहे. वास्तविक आजच्या परिस्थितीत मराठी साहित्याचा योग्य अभ्यास, प्रसार आणि मराठीचा वापर हेच महाराष्ट्राच्या संस्कृतीच्या रक्षणाचे महत्त्वाचे साधन आहे. भाषेची नानाविध

(पृष्ठ क्रमांक ४०वर)

## *जीवनज्यांना कळले*
## *कै. बाबा आमटेंचा जीवनपट*

- **पूर्ण नांव** : मुरलीधर देवीदास ऊर्फ बाबा आमटे
- **जन्म तारीख** : २६ डिसेंबर १९१४
- **जन्मगाव** : हिंगणघाट, जि. वर्धा, महाराष्ट्र
- **शैक्षणिक पात्रता** : बी.ए. (१९३४), एलएलबी (१९३६), नागपूर विद्यापीठ, कलकत्ता येथून कुष्ठरोगनिदानावरील अभ्यासक्रम (१९४९-५०)
- दुर्ग, बेमिता, मध्य प्रदेश, नागपूर येथे वकिली (१९३६-४०)
- वडिलांच्या आज्ञेनुसार वडिलोपार्जित इस्टेटीचा सांभाळ करण्यासाठी वरोरा जि. चंद्रपुर (महाराष्ट्र) येथे वकिली स्थानांतरित १९४०) 'भारत छोडो' आंदोलनात महात्मा गांधी व आचार्य विनोबा भावे यांच्यासोबत सहभाग,.
- गांधीजींनी त्यांना ब्रिटिश सैनिकांच्या तावडीतून एका विवाहित महिलेला सोडवल्याबद्दल 'अभय साधक' असे उत्स्फूर्तपणे संबोधले होते.
- स्वातंत्र्य आंदोलनात कारावास (१९४२)
- वरोरा म्युनिसिपालिटीचे उपाध्यक्ष म्हणून निवडून आले.
- ग्रामीण भागातील लोकांसोबत विशेषतः हरिजन बांधवांसोबत वरोरा येथील मित्राने दिलेल्या सात एकर जागेत 'श्रमाश्रम' चा प्रयोग केला. परंतु पैशांअभावी व वारंवार तेथे मलेरियाने लोक आजरी पडत, त्यामुळे हा प्रयोग बंद करण्यात आला.
- वडिलोपार्जित सर्व मालमत्ता व वरोराजवळील गोरजा येथील ४५० एकर जमिनीचा त्याग केला. (१९४९)
- कुष्ठबांधवांच्या उपचार, प्रशिक्षण व पुनर्वसदासाठी १९५१ साली महारोगी सेवा समिती, वरोराची स्थापना, आपल्या आनंदवन या प्रकल्पात ६ कुष्ठरोगी, १४ रुपये रोख, एक आजारी गाय व ५०एकर सरकारकडून मिळालेली बंजत जमीन या पाठबळावर केली.
- सहकारी आंदोलनात जिल्हा, विभाग व राज्यपातळीवर सहभाग घेतला.
- शैक्षणिक कार्य
- ग्रामीण भागांतील मुलांसाठी व कुष्ठबांधवांच्या मुलांसाठी व कुष्ठविमुक्त झालेल्यांसाठी आनंद निकेतन आर्टस्, कॉमर्स व ॲग्रिकल्चर महाविद्यालयाची स्थापना केली. (१९६३)
- ग्रामाणी भागातील अंध मुलांसाठी आनंद अंध विद्यालयाची स्थापना (१९६६)
- ग्रामीण भागातील अपंग विद्यार्थ्यांसाठी व कुष्ठबांधवांसाठी व्यावसायिक प्रशिक्षणासाठी संधिनिकेतनची स्थापना (१९७२)
- ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शेती, विज्ञान व तंत्रज्ञान यांची सांगड घालून श्रमिक विद्यापीठ या नवीन संकल्पनेची व श्रमशक्ती प्रशिक्षण शिबिर या नावाने सोमनाथ येथे वार्षिक शिबिराची सुरुरवत जि. चंद्रपूर (१९६८ सालापासून)
- महाराष्ट्र, आंध्र व मध्यप्रदेच्या काठावरील आदिवासी विभागातील माडीया गौंड अनौपचारिक शिक्षणाची व्यवस्था (प्रकल्प) की ज्यामुळे ही आदिवासी मंडळी स्वतःला समजू शकतील (१९७८).
- आनंद मूकबधिर, अपंग विद्यालयाची आनंदवन येथे स्थापना (१९८३)




**वर्ष नववे / अंक ३ / मार्च २००८**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १२ वे / अंक ९वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@gmail.com

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | चीनच्या कुनमिंग शहरातील सुवर्ण मंदिर | डॉ. सुधाकर आगस्कर | ३ |
| २) | अक्षरवेल : देखणा उपक्रम | श्री. सचिन गराटे | ६ |
| ३) | जगावेगळा याचक | आशा भिडे | ८ |
| ४) | बदलता भूगोल, वाढते शहरीकरण आणि ढासळते पर्यावरण | श्री. पुनम सिंगवी | १२ |
| ५) | संत चोखामेळा (पूर्वाध) | श्री. शंकरराव मठ | १५ |
| ६) | भारतीय संस्कृती - - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | १९ |
| ७) | पालकांच्या अपेक्षांचे ओझे | श्री. प्रभाकर अरदकर | २९ |
| ८) | सार्वकालिक जाणीवांचा वेध | प्रा. मोहन पाठक | ३१ |
| ९) | परिसरवार्ता | संकलित | ३३ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षणक्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान विधी व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

टी.व्ही., व्हिडिओ, सिनेमा व तत्सम नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **'दिशा'** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन किंवा या मासिकात जाहिरात देऊन आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपर्क
संपादक, दिशा
**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.४०० ६०२**
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**टीप** : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) **''विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा''** या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

अंकाची किरकोळ
विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, पिन कोड व दूरध्वनी कळवावा.

# चीनच्या कुनमिंग शहरातील सुवर्ण मंदिर

*चीनच्या कुनमिंग शहरातील सुवर्ण मंदिराची माहिती असणारा हा लेख आहे. चित्रदर्शी शैलीमुळे मंदिराचे चित्र डोळ्यांसमोर उभे राहते - संपादक*

भारत, ब्रह्मदेश आणि तिबेट या देशांना लागून असलेला चीनचा प्रदेश म्हणजे युन्नान प्रांत होय. काही काळापूर्वी हा प्रांत म्हणजे एक स्वतंत्र राष्ट्र होते. चीनच्या ३५ प्रांतामध्ये या प्रांताला आता एक वेगळे स्थान आहे. नैसर्गिक सौंदर्याने नटलेला प्रांत अशी त्याची आळख आहे. कुनमिंग हे या प्रांताच्या राजधानीचे शहर. या शहरात अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत. सुवर्ण मंदिर हे त्यातलेच एक.



मंदिराचे प्रवेश द्वार

अमृतसरचे सुवर्णमंदिर आपल्याला माहीत आहे. ते संपूर्णपणे सोन्याने मढवलेले आहे. तसे या मंदिराचे नाही. हे मंदिर तांब्याचे आहे. तांब्याला चांगले पॉलीश केले की ते सोन्यासारखे चकाकते. म्हणून या मंदिराला सुवर्ण मंदिर म्हणतात. शहराच्या पूर्वेला एका टेकडीवर हे मंदिर बांधलेले आहे. मंदिर बांधले तेव्हा ते अर्थात गावाच्या बाहेर होते. परंतु आता वसती मंदिरापर्यंत वाढलेली आहे. किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला वाव देण्यासाठी चीनमध्ये दरवर्षी किशोर विज्ञान-तंत्रज्ञान नविनिर्मिती स्पर्धा आयोजित करण्यात येते. २००७ ची राष्ट्रीय स्तरावरची स्पर्धा ऑगस्ट १ त ४ या कालावधीत कुनमिंग शहरात आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कुनमिंगला जाण्याचा योग आला. शहराच्या पूर्व भागातच असलेल्या ग्रँड एक्पो हॉटेलमध्ये आमचे वास्तव्य होते. तेथून हाकेच्या अंतरावर हे सुवर्ण मंदिर आहे. युन्नान ऑटोमोबाईल कंपनीच्या बसने आम्ही मंदिराजवळ पोहोचलो.

तळापासून मंदिरापर्यंत जाण्यासाठी पायऱ्या केलेल्या आहे. अनेक भाविक या पायऱ्या चढून देवदर्शनाला जातात. आपल्याकडे वाहन असेल तर मंदिराच्या पहिल्या प्रवेशद्वारापर्यंत जाता येते. तेथे वाहन ठेवून आणि प्रवेशाचे तिकीट घेऊन आपण मंदिराकडे चालू लागतो. मंदिराकडे जाणारी वाट स्वच्छ आहे, कुठे कचरा नाही की खड्डे नाहीत. रस्त्याच्या एका बाजूला छोटी छोटी दुकाने आहेत. त्यात अनेक रंगीबेरंगी चपला, बाहुल्या, कपडे विक्रीसाठी ठेवलेले असतात. या दुकानांमुळे पर्यटकांना चालायला मुळीच त्रास होत नाही. ही सर्व दुकाने स्त्रियांनी चालविलेली आहेत. आपल्या दुकानांतील वस्तू पद्धतशीर रचून त्या पर्यटकांना आकर्षित करीत असतात. हे घ्या, ते घ्या असे म्हणून त्या पर्यटकांच्या मागे लागत नाहीत.

साधारपणे १० मिनिटे चालून झाल्यानंतर आपण दुसऱ्या प्रवेशद्वाराजवळ येतो. हे प्रवेशद्वार फारच भव्य आहे.

त्यावर रंगीबेरंगी नक्षीकाम केले आहे. चीनी भाषेत मोठ्या अक्षरात मंदिराचे नाव लिहिलेले आपल्याला आढळते. द्वाराच्या आतल्या भागात दोन्ही बाजूस हत्तीचे दोन पुतळे आहेत. येथपासून पायऱ्या चढाव्या लागतात. दोन्ही बाजूला फुलांनी सजलेली बाग आणि मध्यभागी पायवाट असे ते दृश्य आहे. या वाटेने काही पायऱ्या आपण चढून गेलो की मंदिराच्या दर्शनी भागात येतो. हे मंदिर तसे लहानच आहे. त्याच्या मध्यभागी झिंगशावची मूर्ती तर दोन्ही बाजूला त्याच्या रक्षकांच्या मूर्त्या असे मंदिराचे स्वरूप आहे. मंदिराच्या बाह्य भागात अनेक अगरबत्या जळत असतात. त्यांचा सुगंधी धूर मंदिर परिसरात दरवळत असतो. मंदिराचा परिसर खरोखरच चैतन्यमय आहे. तेथे अनेक भाविक ध्यानस्थ बसलेले आपल्याला आढळतात.



मंदिरातील मूर्ती

यान राजाने १६२३ मध्ये हे मंदिर बांधले असा पुरावा सापडला आहे. अशाच प्रकारचे मंदिर युन्नान राष्ट्राच्या उत्तरेला असलेल्या एका राष्ट्रात होते. आपल्या प्रेयसीच्या आग्रहास्तव राजाने तसेच हुबेहुब मंदिर आपल्या राष्ट्रात देखील बांधले. त्या प्रेयसीचे नाव अशीमा होते. अशीमा आणि राजा यांची प्रेमकहाणी सफल झाली नाही. परंतु या प्रदेशाला एक सुंदर मंदिर मिळाले. अशीमा ही एक अतिशय सुंदर युवती होती. मुळात अशीमा या शब्दाचा अर्थच लावण्यवती असा आहे. त्या लावण्यवतीची चित्रकारांनी आपल्या कल्पनेने चित्रे साकारली आहेत. या चित्रांचे प्रदर्शन मंदिर परिसरात भरवलेले आहे. याखेरीज युन्नान प्रांतात उत्खनात सापडलेल्या तांब्याच्या वस्तूंचे प्रदर्शनही मंदिर परिसरात आहे. त्यामध्ये जुन्या काळातील बोटी, मानवी आकृत्या, प्राणी अशा प्रकारच्या वस्तू आहेत. त्या सर्वांचे व्यवस्थितपणे वर्गीकरण करून प्रदर्शनात ठेवलेल्या आहेत. प्रत्येक वस्तूच्या शेजारी त्याबद्दलची थोडक्यात माहिती, चीनी आणि इंग्रजी भाषेत लिहिलेली आहे.

प्रदर्शनात ठेवलेल्या वस्तू लहान आकाराच्या आहेत. तसेच वर्षानुवर्षाच्या उन, वारा, पाऊस यांच्या प्रभावाने खराबही झालेल्या आहेत. म्हणून या वस्तूंच्या मोठ्या प्रतिकृती तयार करून मंदिर परिसरात ठेवलेल्या आहेत. देवदर्शन करून आपण मंदिर परिसरात फेरफटका मारतो तेव्हा या वस्तू आपल्या नजरेला पडतात. पोलादाचे कास्टींग करून हुबेहूब प्रतिकृती तयार करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या सर्व वस्तू उघड्यावर ठेवलेल्या आहेत. त्यामुळे त्यांचे जवळून निरीक्षण करता येते. त्यांच्या शेजारी उभे राहून आपली छायाचित्रे काढून घेता येतात. प्रदर्शनातील अनेक वस्तूंचे प्रतिरूप जरी तयार केले तरी त्यातील मोठ्या तलवारीचे मात्र प्रतिरूप बनविलेले नाही. ही तलवार अतिशय जड असून तिचे वजन सुमारे ४ टन



बागेतील शोभिवंत वस्तू

आहे. तिचा स्वत:चाच आकार एवढा मोठा आहे की त्याची मोठी प्रतिकृती करण्याची गरजच भासली नाही.

मंदिराचा संपूर्ण परिसर अतिशय शुशोभित केलेला आहे. मंदिराचे आजचे स्वरूप जरी चांगले दिसत असले तरी परकीय हल्ल्याला आणि अतिरेकी कारवायांना हे मंदिर अनेकदा बळी पडलेले आहे. १८५७ साली मुस्लीम समाजातील मंडळींनी या मंदिराची नासधूस केली. १८८३ मध्ये त्याची तात्पुरती डागडुजी करण्यात आली. त्यानंतर १९२३ मध्ये पुन्हा मंदिराच्या दुरूस्तीचे काम हाती घेण्यात आले. मंदिर परिसरात वेगवेगळी झाडे लावलेली आहेत. रंगीबेरंगी फुलांचे ताटवे तर जागोजागी दिसतात. विविध फळाफुलांनी युक्त अशी बागच मंदिराच्या मागच्या बाजूला विकसित करण्यात आलेली आहे. तेथे बसण्याची उत्तम सोय केलेली आहे. शाळांच्या सहली आल्या तर विद्यार्थ्यांची सोय व्हावी याची काळजी घेण्यात आलेली आहे.

मंदिराच्या जवळच एक लहानसे दुकान आहे. तेथे प्रत्येक वस्तू १० युहानला मिळते. आपल्या आवडीच्या वस्तू घ्या आणि १० च्या पटीत पैसे द्या असा सोपा हिशेब तेथे आहे. दुकानाच्या एका बाजूला राजाचे सिंहासन उभारून ठेवलेले आहे. एखाद्याला राजासारखा गणवेश करून सिंहासनावर बसायचे असेल तर तशी व्यवस्थादेखील केलेली आहे. त्यासाठी थोडेसे शुल्क द्यावे लागते. राजाचा गणवेश देण्यासाठी एक तरुण मुलगी सतत सज्ज असते. तिला मोडके तोडके का होईना इंग्रजी बोलता येते. परदेशातून आलेले पर्यटक आपली ही हौसदेखील भागवून घेतात आणि सिंहासनावर बसलेल्या राजाच्या वेशात आपली छायाचित्रे काढून घेतात. मनोरंजन आणि खेळ याचा मेळ घालीत भांड्याच्या तळाशी असलेल्या कासवाच्या तोंडात नाणी टाकण्याचे आवाहन करण्यात येते. तळाशी कासव आणि त्यावर अनेक फूट पाणी असल्याने हे काम जिकीरीचे असते. परंतु काही पर्यटकांना त्यातही आनंद वाटतो.

बेल टॉवर हे सुवर्ण मंदिराचे मोठेच आकर्षण आहे. टेकडीच्या एका टोकाला सुमारे चार मजले एवढे उंच हे टॉवर आहे. त्याच्या वरच्या टोकाला सुमारे ४० टन वजनाची तांब्याची घंटा आहे. अनेक पायऱ्या चढून या घंटेपर्यंत पोहोचता येते. ही घंटा वाजविल्यास कोणत्या प्रकारचा ध्वनी निर्माण होतो याची कल्पना घेण्यासाठी शेजारीच जरा कमी वजनाची परंतु हुबेहूब प्रतिकृती असलेली दुसरी घंटा बसविलेली आहे. या घंटेला ठोकण्यासाठी म्हणून माशाच्या आकार असलेला लाकडी दांडा तयार केलेला आहे. या दांड्याने घंटेला एकदा आपटण्यासाठी एक युहानचे शुल्क द्यावे लागते. हे शुल्क वसूल करणारी स्त्री शेजारीच उभी असते. माशाच्या आकाराचा दांडा आपटताच निर्माण होणारा ध्वनी बराचवेळ आसमंतात घुमत राहतो. हा अनुभव खरोखरच संस्मरणीय आहे.




बेलटॉवरची महाकाय घंटा

बेल टॉवरच्या वरच्या मजल्यावरून कुनमिंग शहराचे दृश्य अप्रतिम दिसते. त्यातील नजरेत भरण्यासारखी गोष्ट

(पान क्र. ११वर)

# अक्षरवेल : देखणा उपक्रम

*प्रकाशन संस्थेने रौप्यमहोत्सवानिमित्ताने प्रकाशित केलेली स्मरणिका संग्राह्य असू शकते याचे 'अक्षरवेल' हे पहिले उदाहरण आहे. या असाधारण स्मरणिकेचा हा परिचय- संपादक*




पुण्याच्या 'श्रीवामनराज' प्रकाशन संस्थेचा गेल्या वर्षात महाराष्ट्रात ठिकठिकाणी रौप्यमहोत्सव समारंभ साजरा झाला. त्याच्या सांगता समारंभात संस्थेने 'अक्षरवेल' नावाची अत्यंत देखणी, सुंदर आणि भरगच्च मजकुराची स्मरणिका प्रकाशित केली. हिला स्मरणिका म्हणायचे म्हणून म्हणायचे, नाहीतर हा एक महत्त्वाचा संदर्भ ग्रंथच आहे. अनेक प्रकाशन संस्थांचे विविध उपक्रम होतात, परंतु असा एखादा ग्रंथ प्रकाशित करणे ही पहिलीच घटना असावी. तज्ज्ञ, जाणकार, मर्मज्ञ व्यक्तींनी प्रकाशन संस्थेचा आणि त्यांनी प्रकाशित केलेल्या ग्रंथांचा घेतलेला दीर्घ, सखोल आढावा यात समाविष्ट करण्यात आला आहे.

या स्मरणिकेमध्ये एकूण नऊ विभाग करण्यात आले आहेत. पैकी अक्षरसंचिताचा मागोवा, ग्रंथास्वाद, ग्रंथरुप उद्यम द्विजगती निरुपम, हे तीन विभाग श्रीवामनराव प्रकाशन संस्थेविषयी, त्यांच्या कार्याविषयी आणि त्यांनी प्रकाशित केलेल्या ग्रंथांविषयी माहिती देणारे आहेत, तर आता सदगुरु वर्णवेना, माझा स्वामी कृपेसहित हृदयी वसे, आठवणीतले सदगुरु या तीन विभागांत अनेकांनी केलेलं श्रीसद्‌गुरुंचे स्मरण आहे, उरलेल्या तीन विभागांत, एकात ग्रंथालयाविषयी माहिती देण्यात आली आहे, तर दुसऱ्या विभागात यात्रे विषयक लेख आहेत, तिसऱ्या विभागात महाराष्ट्रात जे विविध कार्यक्रम झाले त्यांचा आढावा आहे. स्मरणिका म्हटली की जाहिराती हव्यातच. त्या इथे आहेत, पण त्या मजकुराच्या मधे मधे न येता शेवटी येतात. त्यामुळे त्यांचा व्यत्यय नाही. रंगीत छपाई आर्ट पेपरवर असून प.पू.श्री. गुळवणीमहाराज आणि प.पू.श्री. मामासाहेब देशपांडे यांची अतिशय सुरेख रंगीत छायाचित्रे यात आहेत. काही छायाचित्रे तर दुर्मिळ आहेत.

स्मरणिकेतील लेखांच्या लेखकांकडे नजर टाकली तर आश्चर्याचा सुखद धक्का बसतो. प्राचार्य राम शेवाळकर, डॉ. सुधाकर देशपांडे, प्रा. वि. शं. चौगुले, सौ. आशा बगे, डॉ. प्रल्हाद वडेर, डॉ. कांचन मांडे, डॉ. स्वर्णलता भिशीकर, श्री. अनिल सामंत, डॉ. गोविंद काळे, डॉ. ब. ना. तुरंबेकर, प्रा. म. अ. कुलकर्णी आणि डॉ. प्रदीप कर्णिक अशा मराठीतल्या नामवंतांनी यामध्ये लिहिले आहे. त्यांच्या या लेखांमुळे एका प्रकाशन संस्थेच्या महनीय कार्याचा लेखाजोखा साक्षात उभा राहिला आहे.

आशा बगेंसारख्या लेखिकेचे दोन लेख यात आहेत. त्यापैकी 'अभ्यासयोगाचे साक्षेपी विवरण' हा लेख श्री ज्ञानेश्वरीतील सहाव्या अध्यायाचे जे श्री. मामांनी विवरण आयुष्यभर केले, त्याचा वेध घेणारा आहे, तर त्यांचा दुसरा लेख म्हणजे त्यांच्याच येऊ घातलेल्या नव्या कादंबरीच्या निर्मितीचा प्रवास सांगणारा आहे. 'चक्रवर्ती' नावाची कादंबरी सौ. बगे यांनी लिहिली आहे. ती कादंबरी श्री.

मामांच्या जीवनावर आहे. त्या कादंबरीच्या निर्मितीचा आलेख बाईंनी इतका छान मांडलाय की वाचून थक्क होतो.

'वाचाली ज्ञानेश्वरी', 'परि गुरुभक्ती जो ढिला', 'श्री स्वामी तनया', 'हा होईल दानपसावो', 'श्रीसद्गुरुस्मरणी', 'श्रीगुरुसाह स्त्री', या ग्रंथांवरचे स्वतंत्र लेख अत्यंत वाचनीय तर आहेतच, परंतु 'माझे ग्रंथमाहेर' हा डॉ. दीपा कार्लेकर यांचा 'श्रीवामनराज प्रकाशना'च्या सर्व पुस्तकांचा अचूक आढावा घेणारा लेख, अधिकच अभ्यासपूर्ण झाला आहे.

ग्रंथांच्या द्वारे निर्माण झालेले तत्त्वज्ञानही काही अभ्यासकांनी नेमके पकडले आहे. 'अक्षरसंचिताचा मागोवा' हा विभाग वगळता अन्य सर्वच विभागांतील लेखक नवखे आहेत. साधक आहेत व तरीही त्यांची विषयाची समज, ग्रंथांचा जिव्हाळा, आपुलकी आणि तळमळ लेखांतून स्पष्टपणे जाणवते.

सद्गुरुंच्या आठवणी तर मूळातून वाचाव्यात अशा आहेत. प्रत्येक लेखकाची प्रचीती निराळी. प्रत्येकाचा अनुभव दिव्य सुगंधित, प्रेमाने, आदराने, मायेने ओथंबलेले हे विश्व कोणाचीही मती गुंग करेल.

यात्रेचे अनुभव तर सुंदर प्रवासवर्णनेच आहेत. त्यात दिलीप खेडेकरांचा दीर्घ लेख म्हणजे पुस्तकाचा विषय आहे. इतके बारकावे आणि इतकी निरीक्षणे त्यांनी नेमकी टिपली आहेत की पुन:प्रत्ययाचा आनंद त्यात साठवलेला आहेच, पण त्याहीपेक्षा भूतकाळ जिवंत करणारी शैली त्यात आहे.

या संस्थेचे ग्रंथालय म्हणजे एक समृद्ध वारसा आहे. त्यातील दुर्मिळ ग्रंथ, वैशिष्ट्यपूर्ण रचना, वाचक अशा सर्वांचा आढावा त्याद्वारे घेतला आहे. विशेष म्हणजे विविध वाचकांच्या प्रतिक्रिया या सोबत दिल्या आहेत, त्या इतक्या बोलक्या आहेत की त्यातून ग्रंथालयाची कार्यशैलीच समोर येते.

या स्मरणिकेचे आगळेपण असे की, त्यामध्ये 'श्रीसद्गुरुकृपाबोध' नावाच्या चौकटी छापलेल्या आहेत. हा कृपाबोध म्हणजे प.पू.श्री. मामांच्या दिव्यवाणीतून आलेला विचार आहे. १०४ चौकटीतून विचार प्रकाशित झालेले आहेत. त्यांचा आचरणात आणण्याच्या दृष्टीने खूप उपयोग आहे.

उदा. ''कृपा' शब्दाची व्याप्ती फार मोठी आहे. आजकाल 'कृपा' शब्द कुठेही वापरला जातो. ते योग्य नाही. भगवंत ज्या रुपाने साधक - हृदयात प्रकटतात, त्या रुप - पद्धतीलाच 'कृपा' असे म्हणतात !'' (क्र. ७१) अशी माहितीची कृपा प्रत्येक पानावर आहे आणि अक्षरात आहे.

संपूर्ण स्मरणिका इतकी देखणी आहे, मांडणी इतकी सुरेख व मोहक आहे की आपण निश्चितपणे चित्रकाराचे नाव आवर्जून पहातो. श्री. विजय गडकरी यांची ही मांडणीची किमया पाना पानावर त्यांची आठवण काढायला लावते.

गर्भश्रीमंत अनुभवाचा ठेवा देणारा आणि अनेकांच्या अनुभवांनी भावविमोर करणारा ग्रंथ, असे याचे स्वरुप जरी असले तरी, 'संतसाहित्याचा' गौरव करणारा, चिंतन प्रकाशाचे किरण टिपणारा अमृत वाङ्मयी ग्रंथ असं याचे स्वरूप जास्त आहे.

ही इतकी देखणी स्मरणिका ४५० पृष्ठांची असून दिवाळी अंकाच्या आकाराची आहे. २५० रुपये किंमतीची ही स्मरणिका केवळ १५०/- रुपयात उपलब्ध असावी, हे या युगाचे आश्चर्य नव्हे काय?

**'अक्षरवेल'**

श्रीवामनराज प्रकाशन रौप्यमहोत्सव स्मरणिका -२००७
संपादक : डॉ. प्रदीप कर्णिक सौ. सुप्रिया देशपांडे
पुणे, श्रीवामनराज प्रकाशन, २००७.
पृ. ४५० मूल्य २५० =०० रुपये

**श्री. सचिन गराटे**
ग्रंथालय विभाग, रुपारेल महाविद्यालय,
माटुंगा, मुंबई - ४०० ०१९

# जगावेगळा याचक

*खडतर जीवनातही वृद्धत्वाकडे छुकलेला माणूस मनाने तरुण असू शकतो. श्रीमती आशा भिडे यांचा एक वेगळा अनुभव - संपादक*

साधारण ८-९ ऑगस्ट ०६ ला डोंबिवलीहून मला श्री. वासुदेव भिडे यांचे मोठे थोरले पत्र आले. पत्र ३ ऑगस्ट ०६ या तारखेचे होते. पत्रातील महत्त्वाचा मजकुर जसाच्या तसा देते आहे. (एक हस्तलिखित पत्र होते व एक आवाहनाची छापील प्रत होती.)

●● ●● ●●

॥ श्रीराम जयराम जयजय राम॥

प्रिय कुलबंधू, सस्नेह नमस्कार

फेब्रु. ०६ मध्ये ठाणे जिल्ह्यातील १६० भिडे कुलबांधवांना एक आवाहन पाठवून ''श्रीराम जयराम जयजय राम'' हा जप करण्याची मी विनंती केली होती. आपल्याला त्यावेळी पत्र पाठवता आले नाही, कारण मी, श्री. दामोदर भिडे यांच्याकडून मिळविलेल्या यादीत आपले नाव नव्हते. मग मला MTNL ठाणे, मुलुंड इथे स्थायिक झालेल्या भिडे बांधवाची यादी डिरेक्टरीतून मिळाली. जप सुरू होऊन ६ महिने झाले आहेत. माझा संकल्प ३११ कोटीचा आहे. आतापर्यंत अर्धा कोटी जप झाला आहे. सर्वांचा मिळून जप संकल्प पुरा होण्यासाठी सर्व भिडे बांधवांच्या साहाय्याची आवश्यकता आहे. विनंती ही की, आपल्या घरातील सर्व कुटुंबियांनी यथाशक्ती जपश्रमदान करावे.

पोस्टकार्ड पाठवून, इ-मेलने किंवा फोनने आपली जपसंख्या आपण कृपया कळवावी. सध्या पवित्र श्रावणमास चालू आहे. पुण्यकर्म करायला मास चांगला आहे. पुण्य आपल्या कर्म बँकेत जमा करावे आणि जपदानाचे पुण्य ही जोडावे.

आम्ही भिडे चांगल्या कामाला नेहमीच पुढे असतो. आपण सहकार्य कराल यात मला शंका नाही.

●● ●● ●●

छापील आवाहन प्रतीत लिहिले होते. (महत्त्वाचा भाग देते,) ''आज आपली ओळख देखील नाही, परिचय नाही तरी पण मी आपला कुळबंधू या नात्याने हे पत्र लिहीत आहे. परमेश्वरी इच्छा असेल तर आपण घनिष्ठ नातलगांप्रमाणे जवळ येणार आहोत.''

''आमच्या कुटुंबात निर्माण झालेल्या काही कौटुंबिक अडचणीतून बाहेर येण्यासाठी अक्कलकोटच्या 'श्री स्वामी समर्थांना' आवाहन केले आणि त्याचवेळी 'श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज' यांचे पुस्तक हाती आले. त्यात म्हटले होते अडचण निवारण्यासाठी काही भव्यदिव्य माझ्या रामाकडून पाहिजे असेल तर तसेच भव्यदिव्य याचकाने रामाला दिले पाहिजे. जो मजकुर वाचनात आला, त्यात असे सांगितले होते की साडेतीन कोटी रामनाम जप केल्यामुळे असाध्य ते साध्य होऊ शकते. हाच आदेश मानून दुसऱ्याच दिवशी देवपूजा करतांना संकल्प सोडला की संकट निवारण करा. मी साडेतीन कोटी रामनामजप करीन. त्याच रात्री निराळ्या स्वरूपात आदेश मिळाला की हे अवघड काम एकट्याने करणे अशक्य आहे. तेव्हा भिडे घराण्याचे सहाय्य घ्या. मग सर्व कुटुंबियांनी जप सुरू केला. नोकरीवाल्यांनीही रोज एक माळ तरी करायचीच.

''दहाजण जपाला लागलो पण महिन्याभरात तो ३

लाखापर्यंतच जातो हे लक्षात आले. या गतीने वर्षाला ३६ लाख होऊ शकेल. हिशोब केला तेव्हा एक कोटी जप व्हायला तीन वर्षे कमीत कमी लागतील. म्हणजे साडेतीन कोटी जप व्हायला अकरा वर्षे म्हणजे जवळ जवळ एक तप. माझे वय ७४ आहे. म्हणजे ८५ व्या वर्षी कदाचित हा संकल्प पुरा होईल. सध्या प्रकृती चांगली आहे पण पुढचे काय सांगावे? तोपर्यंत मी राहीन याची काय शाश्वती?

''संकल्प सोडणे सोपे असते, पण तो तडीला नेणे महाकठीण. स्वामींनी संकल्प सोड सांगितले मी सोडला. आता काय करायचे ! मग स्वामींचे शब्द आठवले की त्यांनी सांगितले भिडे घराण्याची मदद घे. नित्युंदन गोत्राचे आपण सर्व भाऊबंद एकच आहोत. फांद्या दुरावल्या तरी, मूळ वटवृक्ष एकच असतो. मग सर्वांना पत्रे टाकली.''

''तुमच्याकडे जपाचे पुण्य आणि दानाचे पुण्य असे दुप्पट पुण्य जमा होणार आहे. यामुळे संकल्प लवकर पुरा होईल. सर्वांना जपाने मन:शांती सुखसमृद्धी लाभेल. या संकल्पाचे उद्यापनही मला याची देही याची डोळा करता येईल. त्यावेळी आपणा सर्वांना आमंत्रण द्यायची संधी मला मिळेल आणि एक भिडे संमेलन भरवता येईल.''

''त्यामुळे पुढे काही वर्षे आपण सर्व भिडे मंडळी अनामिक प्रेमरज्जूने एकत्र येऊ. यामध्ये आपला उत्कर्ष आहेच आणि माझी संकल्पसिद्धी. रामनामजपाने आपण सर्व एक होऊ या आणि हा जगन्मंथाचा रथ मुक्कामापर्यंत पोचवू या.''

आपला
वासुदेव भिडे

आवाहनामागे त्यांचा परिचय होता. तो थोडक्यात सांगते.

मी निवृत्त. सध्या मुलाकडे वास्तव्य डोंबिवली येथे. मूळचा ठाणेकर. जन्मापासून ते निवृत्तीपर्यंत ठाणेकर. लिहिणे, वाचणे, गाणे हे छंद. पत्नी मनोरूग्ण १९७० ते ९० हा वीस वर्षाचा काळ खडतर गेला. छंदानेच मनोबळ दिले. त्यामुळे मीही तरलो नि पत्नीही रोगमुक्त झाली. पण त्या खडतर काळात नोकरी, तीन लहान मुले (१० वर्षे, ८ वर्षे आणि ३ महिने) आणि मनोरूग्ण पत्नी अशा तीन आघाड्यांवर लढण्याकरता हाच छंद कामी आला. मी श्रीराम, श्रीकृष्ण, शिवाजी, पांडव यावर गीते लिहिली व त्या वीस वर्षाच्या काळात भाषण रोमांचकायी इतिहासही मी 'झपाटलेली' या पुस्तकात बद्ध केला आणि मन मोकळे करणारी गीतंही त्या पुस्तकाच्या परिशिष्टात समाविष्ट केली. अनेक बक्षिसे मिळवली. दूरदर्शनवरही एका परिसंवादात संधी मिळाली. एस्.टी. मधे नोकरीला असताना विरंगुळा म्हणून ते लिखाण केले. त्याला कारुण्याची झालर आहे. १९९० मधे निवृत्त झालो. त्यानंतरचा काळ ही मी तेवढ्याच रसिकतेने कंठीत आहे. १२०० च्या वर चारोळ्या लिहिल्या. ''बोरं चिंचा'' या संग्रहात त्या ग्रथित केल्या आहेत. सध्या माझा उद्योग म्हणजे, माझ्या घराजवळच विरंगुळा स्तंभावर मी 'बकुळ फुले' या नावाखाली रोज नवीन ताज्या विषयावर चारोळ्या लिहितो. या उपक्रमाला ०६ साली एक वर्ष पूर्ण झाले आहे.

मनोरुग्ण व बिछान्याला खिळलेल्या पत्नीला बरे करण्यासाठी वयाच्या ७४ व्या वर्षीही मी योग प्रवेश व योगपरिचय या परिक्षा देऊन, पत्नीला मी दररोज प्राणायाम आणि बैठकीत बसून करायची योगासने शिकवतो आहे, ज्यामुळे तिच्या प्रकृतीत फरक पडला आहे.

●● ●● ●●

पत्र, आवाहन पत्र व त्यांचा परिचय वाचून मन हेलावले. या माणसाने किती कष्टात दिवस काढले आहेत. तरी श्रद्धा, जिद्द, हिम्मत, मनोबळ याच्या जोरावर परिस्थितीवर मात केली आहे. खरोखर या न पाहिलेल्या बिन ओळखीच्या माणसाबद्दल मनात स्नेह व आदरभाव

*नको नको मना । गुंतू मायाजाळी ॥*
*काळ आला जवळी । ग्रासावया ॥ - तुकाराम महाराज*

निर्माण झाला. योगायोगाने माझ्या सासऱ्यांचे नाव ही वासुदेव भिडेच होते. त्यामुळे, हा आदर दुणावला.

वाटंल, कोणी अन्न, वस्त्र, निवारा, धन यांचे दान मागतात. रक्तदान, नेत्रदान, देहदान अशीही दाने आहेत. यांपैकी यांनी काहीच मागितलेलं नाही. मागून काय मागितलं तर जपश्रमदान ! जप त्यांच्या संकल्पसिद्धीसाठी करायचा; पण त्या जपाचे पुण्य आणि दानाचे पुण्य असे दुप्पट पुण्य आपल्या कर्म बँकेत जमा होणार. मग का नाही करायचे हे पुण्य कर्म ! त्यांच्या संकल्पसिद्धीला आपला तेवढाच खारीचा हातभार. त्यांच्या महान जपयज्ञात आपल्याही काही समिधा.

मग शुभस्य शीघ्रम. ताबडतोब मी स्वत: माझ्या दोन मुलांसुनांनाही होईल तेवढा जप करा, म्हणून सांगितले. त्यावेळी माझी आई दोन दिवस माझ्याकडे रहायला आली होती. वय वर्षे ८२. ती म्हणाली माझा जप चालेल का विचार त्यांना. माझी आई तर प्रत्येकाच्या नावाने लाख लाख जप करायची. ते हो म्हणाले आणि एक लाख जप दोन दिवसात आईने त्यांच्यासाठी केला. माझी धाकटी नणंद भिड्यांची माहेरवाशीण. तिने सुद्धा या जपाला हातभार लावायचं ठरवलं.

त्यांचा संकल्प लवकर सिद्धीला गेला पाहिजे. हा मला ध्यासच लागला. मग रात्री झोपतांना, उठल्यावर अगदी वेळ मिळेल तेव्हा, टी.व्ही. पाहतांना सुद्धा हातात माळ धरायची. मी तर सगळीकडे माळा ठेऊनच दिल्या होत्या. घरात प्रत्येक खोलीत. नाहीतर हाताच्या बोटानही जप व्हायचा. पर्समध्ये पण माळ असायचीच. भावाकडे हाजीअलीला ठाण्याहून जातांना बसला दोन ते अडीच तीन तास वेळ लागायचा. माळ जपायला लागल्यावर तो वेळ सार्थकी लागल्यासारखे वाटायचे. विमान प्रवासातही रामनामाचा जप सतत चालू असायचा. एवढं मनापासून आणि इतकं नामस्मरण पूर्वी कधी झालं नसेल. त्यामुळे मन:शांती, आत्मिक समाधान लाभत होतं. त्यांनीच सांगितले होतं जप जमेल तेवढा रोज करायचा. केवढा, किती, केव्हा, कसा, कुठे याला बंधन नाही. जपाची नोंद तुम्हीच करायची नि कळवायचा. समर्थांनीही म्हटले आहेच 'अहो उठता, बसता, हसता, रडता' कधीही कुठेही कुणीही व केव्हाही रामनाम घ्यावे.

खरे तर, त्यांच्या आवाहनामुळेच माझ्या मुखी सतत रामनाम यायला लागले. असं वाटतं की आपला श्वासही ''श्रीराम जयराम जयजयराम'' हाच होतोय.

आणि खरोखरच पुण्याचं माप देवानं लागलीच पदरात टाकलं मला नातू झाला. गंमत म्हणून सांगते, मोठी नात झाली त्यावेळी मी मुक्ताई महिला मंडळात 'गीता प्रवचन' करत होते. सुनेच्या दुसऱ्या खेपेलाही एका सोसायटीत दर गुरुवारी एकेका अध्यायावर गीता प्रवचन चालू होते. मनोमन भगवंताला म्हटले पहिल्यांदा तू गीता पाठवलीस. आता तू स्वत:च ये. खरोखर ते आले, नातवाच्या रुपाने. आता याला श्रीकृष्ण म्हणू की श्रीराम ! ही गंमत झाली. सर्व देव एकच. मग त्याला दूध पाजताना, मांडीवर झोपवतानाही 'श्रीराम जयराम जयजय राम' मग तो लबाडही गोड हसायचा. असा हा नाम महिमा.

२४/११/०७ ला हा संकल्प सिद्धीला गेला. २४ सप्टें. ०६ ला चालू केलेला हा संकल्प इतक्या अल्पावधीत सिद्धीला गेला. त्या दिवशी श्री. वासुदेवराव भिड्यांनी डोंबिवलीच्या ब्राह्मणसभेत हा संकल्पसिद्धी सोहळा मोठ्या थाटात साजरा केला. हॉलच्या बाहेर दाराशी 'श्रीराम जयराम जयजयराम' हा मंत्र खूप सुरेख रांगोळीने, फुलांनी सजविला होता. पुण्याला झालेल्या विराट चित्तपावन ब्राह्मण संमेलनातही चारपाच हजार भिडे मंडळी जमली होती. पण त्याआधीच श्री. वासुदेव भिडे यांनी हे छोटे भिडे कुल संमेलन भरवले होते. होमहवन, मंत्रोच्चार या पवित्र वातावरणात श्री. वासुदेवरावांबरोबर पूर्णवेळ त्यांच्या

पत्नीही होमाला बसल्या होत्या. पतीच्या या तपश्चर्येला साथ द्यायला भगवंताने तेवढे मनो व शारिरीक बल ही त्यांच्या पत्नीला दिलं होतं. त्या पवित्र पुण्यवान पती पत्नीच्या पायावर नतमस्तक होतं मी त्यांची पहिल्यांदाच ओळख करून घेतली. मुलगा, सून, मुली, जावई, नातवंडे आजी आजोबांच्या पुढे मागे धावत होती. महाप्रसादाची पंगत बसली तेव्हा यजमान व यजमानीणबाई जातीनं पंगतीत फिरत होते. हसत मुखानें हात जोडून प्रत्येकाची विचारपूस करीत होते. जाताना प्रसाद व त्यांचे गुरू श्रीवासुदेवानंद सरस्वती यांचा फोटो असे प्रत्येकाला भेट दिले जात होते. मी त्यांना म्हटलेही, की तुमच्यामुळेच ही नामजपाची गोडी लागली.

पंचात्तरी ओलांडलेल्या या माणसाने तेथे सर्वांना जाहीर केले की तुमच्या सर्वांच्या अनमोल सहकार्यामुळेचही संकल्पसिद्धी झालीय. आता मी पंधरा कोटीचा नवीन संकल्प सोडला आहे. ''श्रीराम जयराम जयजयराम'' या तेराक्षरी मंत्राचा. तेव्हा जपत रहा - ''श्रीराम जयराम जयजयराम''... त्यांच्या या वयातही असलेल्या उमेदीला व आत्मविश्वासाला माझा सलाम.

**आशा भिडे**
बी/९ विजय अपार्टमेंटस्
'आराधना' टॉकीजजवळ
ठाणे (प) ४०० ६०२
दूरध्वनी - २५४१०१४०

(पान क्र. ५ वरून)

**चीनच्या कुनमिंग शहरातील सुवर्ण मंदिर**

म्हणजे शहरातील झाडे. गुजरात मधील गांधीनगर हे जसे जंगलात वसलेले गाव वाटते तसाच भास बेल टॉवरहून कुनमिंग शहराकडे पाहताना होतो. शहराच्या प्रगतीच्या अनेक पाऊलखुणा आपल्याला येथून पाहायला मिळतात. जुन्या राजवटीतील दाटीवाटीने बांधलेली जुनी घरे जशी दिसतात तसेच, नवीन प्रशस्त इमारती देखील आपल्याला दिसतात. शहरात अनेक ठिकाणी नवीन इमारतींचे बांधकाम चालू असलेले दिसते. रस्त्यांचे बांधकाम बहुतांशी पूर्ण झालेले आहे. तथापि, काही ठिकाणी नवीन रस्त्यांचे बांधकाम चालू असल्याचे दिसते. रस्त्यांचे बांधकाम अतिशय पद्धतशीरपणे चालू असते. प्रथम जमीन सपाट करून घेतली जाते. वाहतुकीला नंतर अडथळा होऊ नये म्हणून आवश्यक तेथे आधीच सोय केलेली असते. धर्म, सामाजिक सुधारणा, वैज्ञानिक प्रगती या सर्वांचे दर्शन सुवर्णमंदिरातून होते असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

**डॉ. सुधाकर आगरकर**
४,अनिल को-ऑप. सोसायटी,
नगरपालिका प्राथमिक शाळेजवळ, काटेमनावली,
कल्याण (पूर्व)
दूरध्वनीः ९१-२५१-२३३२५२१
Email: s_agarkar@hotmail.com

•••

## *या महिन्यातील सुविचार*

*या महिन्यात (मार्च) दासनवमी व तुकाराम बीज या दोन संतांच्या आठवणीचे दिवस आहेत. त्यानिमित्ताने या दोन संतांची वचने पृष्ठतळाशी दिलेली आहेत. आपटून पालटून दोन्ही संतांची वचने वाचकांपर्यंत पोहोचवण्याचा हा प्रयत्न आहे. तसेच मुखपृष्ठ क्र. ३ वर त्यांची छायाचित्रे दिली आहेत- संपादक*

# बदलता भूगोल, वाढते शहरीकरण आणि ढासळते पर्यावरण

*दुसऱ्या महायुद्धानंतर जगभराचं नागरीकरण वाढत आहे. त्याचे दूरगामी परिणाम पर्यावरणावर होत आहेत. भूगोल बदलत आहे; त्याचबरोबर चिंता वाटावी इतक्या गंभीर प्रमाणात पर्यावरण ढासळत आहे. पर्यावरण क्षेत्रात भरीव काम करणारे पर्यावरणप्रेमी श्री. पुनम सिंगवी यांनी आमच्या विनंतीस मान देऊन पाठवलेला विशेष लेख - संपादक*

आपल्या जैविक सृष्टीची निर्मिती करताना परमेश्वराने सगळ्यात शेवटी मानवाची निर्मिती करुन त्यास पृथ्वीवर पाठविले असे म्हणतात. याच परमेश्वराला विज्ञानाच्या स्वरूपात बघणारे आजचे वैज्ञानिक जैविक सृष्टीतील उत्क्रांतीचा आजवरचा शेवटचा टप्पा म्हणजे मानव असे वेगळ्या पद्धतीने सांगतात. मात्र सगळ्यात शेवटी पृथ्वीवर अवतरणारा मानव नावाचा हा जैविक घटक ईश्वराच्या खालोखाल असणारा असा शक्तिमान प्राणी बनून या जैविक सृष्टीला आपल्या ईच्छेप्रमाणे ओरबडण्याचा, बदलण्याचा आणि वाकविण्याचा प्रयत्न सातत्याने करीत असतो. असे करीत असताना आपल्या हिताच्या पलीकडे जाऊन तो या सृष्टीतील इतर घटकांचा विचार करतांना अभावानेच दिसतो ही एक दुर्दैवी वस्तुस्थिती आहे.

पृथ्वीवर सगळ्यात शेवटी अवतरलेला हा मनुष्य प्राणी इतर प्राण्यांप्रमाणेच उघडा - बोडका, रानावनातून, कधी वृक्षांच्या तर कधी निसर्ग निर्मित गुहांमधून राहायचा. पशू-पक्ष्यांचीच शिकार करीत आपला उदरनिर्वाह करायचा. हळूहळू तो वेगवेगळ्या वृक्षांची फळे, कंदमुळे आदी खायला लागला. शेती करू लागला आणि तेथूनच निसर्गनिर्मित पर्यावरणाचा ऱ्हास व्हायला सुरुवात झाली.

शेती करण्यासाठी मोकळी जमीन हवी, म्हणून तो रानावतांचा नाश करू लागला. हळूहळू तो सुरक्षित घरे बांधायला लागला. शरीराचे रक्षण करण्यासाठी वेगवेगळ्या घटकांपासून वस्त्रे निर्माण करु लागला. त्यला अग्नीचा शोध लागून तो कृत्रिम उष्णता आणि प्रकाशाची निर्मिती करायला शिकला. त्यानंतर एकेक यांत्रिक करामती लक्षात




येत तो यंत्रनिर्मिती करु लागलां. आपल्या नित्याच्या गरजा अधिक चांगल्या प्रकारे, प्रभावीरीत्या, कमी श्रमांत आणि अधिक वेगाने कशा पुऱ्या करता येतील यांचा न संपणारा शोध घ्यायला त्याने सुरुवात केली. रोजच्या गरजा रोज न भागविता भावी काळ आणि पिढ्यांसाठी देखील तरतूद करुन ठेवण्याचा 'ध्यास' आणि नंतर 'सोस' त्याला लागला. या सोसातूनच तो 'निर्मिती' कडून 'विध्वंसा' कडे केव्हा आणि कसा वळला आणि भावी पिढ्यांची तरतूद करता, करताच त्यांना भग्न व्हायच्या अवस्थेत नेऊन सोडणाऱ्या अवस्थेत कसा येऊन पोहोचला हे त्याचे त्यालाच कळले नाही !

कृषिप्रधान संस्कृतीकडून औद्योगिक संस्कृतीकडे जात असताना जमिनीचा उपयोग केवळ वननिर्मिती आणि शेती करणे एवढाच नाही, हे देखील त्याच्या लक्षात यायला लागले. त्यावर तो घरांबरोबरच कारखान्यांची उभारणी करायला लागला. जमिनीच्या पोटात वेगवेगळ्या प्रकारची खनिज संपत्ती दडलेली आहे. हे लक्षात आल्यानंतर तो



तिचे मोठ्या प्रमाणावर उत्खनन करू लागला. आणि हे सर्व करीत असताना त्याच्या हातून निसर्गनिर्मित सृष्टी आणि साधनसंपत्तीचा फार मोठ्या प्रमाणावर विध्वंस होऊ लागला. ही सृष्टी ईश्वराने केवळ आपल्यासाठीच निर्माण केली आहे, असा त्याचा भ्रम झाला आणि त्यामुळे सृष्टीतील इतर घटकांच्या अस्तित्वाचा आणि जीवन मरणाचा त्याने फारसा कधी विचारच केला नाही.

त्याला लागलेल्या अनेक शोधांमध्ये वीज आणि वाहननिर्मिती हे दोन शोध अतिशय दूरगामी परिणाम करणारे ठरले असे मी म्हणेन. वेगवेगळ्या घटकांपासून वीज आणि इंधन निर्मिती करताना त्याच्या हातून पर्यावरणाचे अधिकाधिक नुकसान होत आहे. खरे म्हणजे, या दोन शोधामुळेच तो भौतिक उन्नतीची शिडी भराभर चढू लागला आहे आणि त्याच कारणांमुळे त्याची संपूर्ण विध्वंसाकडे वाटचाल वेगाने होत आहे. केवढा विरोधाभास आहे नाही? खनिज तेल, कोळसा आदी वेगवेगळ्या माध्यमांतून तो वीजनिर्मिती करीत असतो. त्यासाठी ज्या प्रमाणात वृक्षतोड आणि जमिनीच्या उत्पादक शक्तीचा ऱ्हास होत असतो, त्या प्रमाणात त्या घटकांची पुनर्निर्मिती त्याच्याकडून होत नाही. हीच गोष्ट इंधनाची देखील. आता, इंधनासाठी वेगवेगळ्या वनस्पती व वृक्षबियांचा वापर करण्याच्या प्रयत्नांत अधिकाधिक शेतजमीन अशा प्रकारच्या वनस्पतींच्या लागवडीखाली येण्याचा वेग वाढणार आहे.



त्यामुळे साहजिकच मोठ्या प्रकारचे पर्यावरणीय बदल संभवणार आहेत.

जीवनासाठी, शेतीसाठी पाणी आवश्यक असते. म्हणून तो आधी वाहत्या नद्या आणि जलस्त्रोतांच्या सभोवताली वस्ती करून राहायचा. मात्र मोठमोठाली धरणे बांधून पाणी साठवून जलवाहिन्यांद्वारे ते खूप लांबवर नेता येण्यासारखे असते, हे लक्षात आल्यानंतर गांवे आणि शहरे वसविण्यासाठी जागा निवडण्याचे त्याचे निकषही बदलू लागले. ''पाणी तिथे वस्ती'' ही संकल्पना बदलून ''वस्ती तिथे पाणी'' असा विचार त्याला अधिक भावला. मग अशा वस्तीकडे जायला रस्ते, वापरायला वीज इ. सगळ्याच गोष्टी आल्या. त्यामुळे आधी नद्यांकाठी वसविलेली खेडी ओस पडून अधिक भौतिक सुखसोयी आणि रोजगार मिळण्याची शक्यता असलेल्या शहरांकडे धाव घेण्याचा कल वाढीस लागला. हे साहाजिक आहे, हे कसे नाकारता येईल ?

त्यामुळेच या प्रक्रियेत आता समाजजीवन आणि पर्यावरणाबरोबर भूगोल देखील बदलू लागला आहे ! वनांच्या जागी धरणे, कारखाने, शहरे, रस्ते दिसू लागले आहेत! या वनांच्या आश्रयाने राहाणारे पशुपक्षी आणि वृक्ष-वनस्पतींच्या अनेक प्रजाती नष्ट तरी होत आहेत किंवा दिवसेंदिवस संख्येने कमी तरी होत आहेत.

दुसऱ्या बाजूला, जगभरातील मनुष्यसंख्या आणि वस्ती सातत्याने वाढत आहे. अनेक प्रकारची रसायने आणि कृत्रिम साधनसामग्रीचा वापर करीत मनुष्य आपले सरासरी आयुष्यमानदेखील वाढवीत आहे. स्वत:ला पृथ्वीवरील सर्वात बुद्धिमान, शक्तिमान आणि श्रेष्ठ समजणारा मानव जैविक सृष्टीवर सर्व तऱ्हेने आक्रमण करीत, त्याच्या विनाशास कारणीभूत होत आहे. यातच अंतिमत: त्याचादेखील विनाश सामावलेला आहे. भौतिक सुखाच्या परमोच्च बिंदूवर पोहोचल्यानंतर पलिकडे उताराची वाट नव्हे तर कडेलोटच असणार आहे.

आपल्याला हे थांबवता येईल ? एक प्रश्न स्वत:ला विचारून बघा. आता तुम्ही वीजेचा आणि वाहनांचा वापर अजिबात करू नका असे कोणी सांगितले तर आपल्याला ते शक्य आहे असे वाटते? आपण खेड्यांकडून भौतिकसुखाची साधने असलेल्या शहरांकडे येत असतो. मात्र हा प्रवास उलट्या दिशेने वळविणे कितपत शक्य आहे? या प्रश्नांच्या उत्तरातच सामावलेले असेल माझ्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर.

भौतिक सुखाच्या माध्यमातून आणि त्यासाठीच सृष्टीवर नियंत्रण ठेवू इच्छिणाऱ्या मानवाची ही वाट अशीच चालू राहणार आहे. भविष्यात जे दिसते आहे, ते टाळता येण्यासारखे नसले तरी अधिकाधिक लांबवता येण्यासारखे मात्र निश्चितच आहे. त्यासाठी नैसर्गिक संसाधानाचा वापर करीत असताना त्याचा अपव्यय होणार नाहीना, हे देखील बघायला हवे. अशा संसाधनांचा पुनर्वापर आणि पुनर्निर्मितीवर देखील भर देत रहायला हवे. वृक्ष तोडणे अटळ असले तर, तोडल्या जाणाऱ्या प्रत्येक वृक्षासाठी सर्वसहभागतून किमान दहा - दहा वृक्ष नव्याने लावले जातील हे बघायला हवे. पावसाळ्यात पडणारे पाणी जमिनीवर आणि जमिनीखाली अधिकाधिक प्रमाणात साठवून ठेवायला हवे. साठवून ठेवलेले असे पाणी प्रदूषित न होता वापरण्याजोगे राहील असे बघायला हवे. खाणकाम झालेल्या जमिनी पुन्हा वापरात कशा आणता येतील याचा प्राधान्याने विचार व्हायला हवा. प्रत्येक व्यक्तीला जगण्यासाठी कमीतकमी किती उत्पादक जमिनीची आवश्यकता असते, याचे आडाखे शास्त्रज्ञांनी बांधलेले आहेत. एकीकडे लोकसंख्या वाढत असताना या जमिनीत वृध्दी करता येणे मात्र आपल्याला शक्य नाही. त्यामुळेच आता मानवाची वक्रदृष्टी इतर ग्रहांवरदेखील पडू लागली आहे ! मात्र इतर ग्रह - ताऱ्यांचा असा खजिना आपल्या हाती लागायच्या आधी, आपण आपल्या ग्रहाचे अधिकाधिक रक्षण करीत राहण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी केवळ आपल्या भौतिक सुखाचाच विचार न करता जैविक सृष्टीतील इतर घटकांच्या अस्तित्वावर आणि भावी पिढ्यांच्या हक्कांवर गदा येणार नाही याचेही भान ठेवायला हवे. याचेच नांव ''शाश्वत विकास!''

अन्यथा बदलता भूगोल, वाढते शहरीकरण आणि बदलत्या पर्यावरणातून होणारा आमचा भौतिक विकासच विनाशाच्या वाटेवर आम्हाला नेऊन सोडेल हे निश्चित. मात्र, अशा विनाशात सर्वात शेवटी नष्ट होणारा घटक हा सर्वात शेवटी पृथ्वीवर अवतरणारा मानवच असेल हेदेखील तेवढेच निश्चित !

**श्री. पुनम सिंगवी**
फ्लॉवर व्हॅली, नारळी पाडा,
ठाणे ४०० ६०१.

# श्री संत चोखामेळा
## (पूर्वार्ध)

*नरदेह प्राप्त झाला या संधीचे सोने करून श्रेष्ठ संतांच्या पंक्तीत स्थान मिळविलेले श्री संत चोखामेळा यांच्या संबंधीचा हा लेख - संपादक*

**संतांची भूमी -**

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. इथे अनेक लहान थोर संत होऊन गेले. ते सारेच ईश्वरनिष्ठ होते. त्यांनी ईश्वराची कृपा प्राप्त करून घेतली होती. त्यास सातशेहून अधिक वर्षे लोटली. आजही त्यांचे जीवन, कार्य व वाङमय तितकेच स्फूर्तिदायक आहे. ज्ञानेश्वर महाराजांच्या समकालीन संतापैकीच एक, संत श्री चोखामेळा अस्पृश्य कुटुंबात जन्माला येऊनही त्यानी फार मोठे कार्य केले. मात्र, त्यांच्या चरित्राबद्दल फारशी माहिती उपलब्ध नाही. हे आपले दुर्दैव आहे. मंगळवेढे येथे काम करताना अंगावर किल्ल्याची भिंत कोसळून शकडो मजूर ढिगाऱ्याखाली चिरडले गेले; त्याच ढिगाऱ्याच्या खाली चोखोबाही दृष्टी आड झाले. त्यांच्या बरोबर त्यांची विपुल अभंग संपत्तीही नष्ट झाली. ती शोधून काढण्याचा फारसा प्रयत्न झालेला दिसत नाही.

**संतानी अंगीकारलेले कार्य -**

राजकीय पारतंत्र्यात आपण का पडलो याच्या अनेक कारणांपैकी एक कारण, सामाजिक विषमता. ते दूर करण्याचे महान प्रयास संतानी केले. सामाजिक विषमतेमुळे समाजात बेदिली माजली. त्यामुळे परकीय आक्रमणांविरुद्ध एकजुटीने तो लढू शकला नाही. परिणामी, पारतंत्र्यात खितपत पडावे लागले. ही उणीव दूर करण्याचे प्रयत्न संतानी केले, याला विशेष महत्व आहे.

याच बरोबर आपले तत्त्वज्ञान व धर्मविषयक ग्रंथ संस्कृत भाषेत असल्याने बहुजन समाज या बाबतीत अनभिज्ञ राहिला. संतानी आपल्या प्रभावी व प्रासादिक वाणीने तत्त्वज्ञान व धर्म विषयक माहिती बहुजन समाजासाठी प्रथमच मायबोलीत उपलब्ध करुन दिली. शिवाय अनेक देव देवतांचे उठलेले मोहोळ बाजूला सारुन एका श्री विठ्ठलाचे महत्व वाढवून सामाजिक ऐक्याची मुहुर्तमेढ केली. यामुळे सामाजिक स्थैर्य टिकून राहण्यास मदत झाली.

वास्तविक संतांचे कार्य मुख्यत: अध्यात्म विद्येचा प्रसार अगदी सामान्य जनापर्यंत पोचविण्याचे होते. समाजात शांतता, परस्परांबद्दल प्रेम, उच्चनैतिक व्यवहार निर्माण होण्यासाठी संतांनी आटोकाट प्रयत्न केले. संतांच्या कार्यांचे महत्त्व ध्यानात येण्यासाठी सांप्रतची सामाजिक स्थिती कशी आहे याचे अवलोकन करणे योग्य ठरेल.

**सांप्रत सामाजिक परिस्थिती -**

यांत्रिक युगामळे जीवनात क्रांती झाली आहे. सुख साधनांची रेलचेल झाली आहे. मात्र याचा फायदा सर्वानाच योग्य प्रमाणात होत नसल्याने भयानक विषमता निर्माण झाली आहे. एकीकडे अतिशय श्रीमंती तर दुसऱ्या बाजूला अतिशय दारिद्रय अशी स्थिती पाहावयास मिळते. अतिशय श्रीमंत लोकांचे जीवन सडत आहे. तर दारिद्रयामुळे दरिद्री लोकांचे जीवन होरपळून जात आहे. सुख साधनांच्या अनेक वस्तूंची विपुलता असल्याने मानवाची याहून इतर गोष्टी बद्दलची संवेदनाच नाहीशी झालेली आहे. मन बोभट बनले आहे. त्याला जडता आली आहे. त्याच्या ठिकाणी हृद्य शून्यतेचे राज्य वाढत चालले आहे. माणूस एकाकी जीवन जगत आहे. त्याच्या आनंदात व दु:खात सहभागी होणारी

माणसे कमी होत चालली आहेत. असे स्वकेंद्रित जीवन मानव आज जगत आहे. थोडक्यात सामाजिक भावनेचा अभाव व्यक्तिगत जीवनात एकाकी पणा असे चित्र आज आपल्याला आढळत आहे.

**भौतिक स्वरूपाचे शासन -**

संपत्ती व ज्ञान ही जर संयमी मानवाच्या हातात राहातील तरच त्यातून सुख निर्माण होईल. अनेक मार्गानी केवळ उपभोगाची लालसाच शमविण्याच्या कामात दंग असलेल्या मानवात संयम कोढून आढळेल? आज सत्ता व संपत्ती या दोन्ही गोष्टी भौतिक आकांक्षांनी भारावलेल्या लोकांच्या हातातच आहेत. यंत्र युगाने पुष्कळच समस्या निर्माण केल्या आहेत. लोकांचे जीवन सुखी होत असल्याचा आभास निर्माण केला जात असतो. वस्तुत: तसे काही घडताना आढळत नाही. यांत्रिक वा भौतिक शक्तीचा तोल आत्मिक शक्तीने सांधला गेला पाहिजे. आज भौतिकतेचे पाऊल पुढे, तर अध्यामाचे पाऊल मागे आहे.

**संतांची शिकवण आवश्यक -**

संतांची शिकवण आजही उपयुक्त व आवश्यक आहे. आज औद्योगिक व वैज्ञानिक क्षेत्राच्या शिखरावर आपण आहोत म्हणून शांतीचे, मानवतेचे, उच्च नैतिक मूल्यांचे महत्त्व कमी ठरणारे नाही. संतांची ही शिकवण आजही आवश्यक नाही असे कोण म्हणेल? याच गोष्टीचा मागोवा घेत संत जीवन पाहिले पाहिजे. अवमानलेल्या अंत्यज कुळात जीवन जगत असलेल्या चोखोबाने आपल्या भक्तिबळावर व आत्मनिष्ठेवर श्रेष्ठ संत मालिकेत स्थान प्राप्त करून घेतले. त्यांचे जीवन चरित्र आजही आदर्श आहे. परिस्थिती चोहोबाजूंनी कितीही प्रतिकूल असली तरी, तिच्यावर मात करून प्रयत्नांनी परमेश्वर पदही मानवाला प्राप्त करता येते, हीच शिकवण संत श्री चोखामेळा यांनी आपल्या स्वत:च्या उदाहरणाने दाखवून दिले आाहे.

**पंढरपूर व भागवत धर्म -**

पंढरपूर क्षेत्रास दक्षिण द्वारका मानण्यात येते. वारकरी सांप्रदायाचे उपास्य दैवत श्री विठ्ठल तेथे विद्यमान आहे. वारकरी पंथातील उपासक श्री विठ्ठलाची सगुणोपासना, नामस्मरण, हरिकीर्तन यात रस घेणारे आहेत. ते पंढरी व आळंदीच्या वाऱ्या करतात. भागवत धर्माची शिकवणूक समानतेची आहे. देवापुढे उच्चनीच भेदभाव नाही. याच कारणामुळे उच्च वर्णियांच्या अहंमन्यतेमुळे व तुसडेपणाने वागणे असल्यामुळे ज्यांची मने व्यथित झाली आहेत ते शूद्रादी सामाजिक घटक साहजिकच वारकारी पंथाकडे ओढले गेले. पांडुरंग भावाचा भुकेला आहे, तो जातपात पाहात नाही, वर्ण भेदही मानीत नाही याचा अनुभव त्यांना येवू लागला. ज्ञानेश्वरांपासून चोखामेळ्यापर्यंत सर्व जातीचे भक्त पांडुरंगाला सारखेच प्रिय आहेत. कारण विठ्ठल संप्रदायात उच्च नीच भावाची उपाधी नाही; तसेच जन्मसिध्द विषमतेची बाधा नाही.

**संत चोखामेळा यांचा जीवन वृत्तांत -**

चोखोबांचे माता पिता, त्यांचे जन्मकाळ या गोष्टींची फारशी विश्वसनीय माहिती नाही. या संबंधी लोककथा रूढ आहेत. त्यांचाच आधारे चोखोबांची माहिती मिळवावी लागते. दुसरा पर्याय नसल्याने लोककथाच प्रभावी ठरतात. एक लोककथा अशी सांगितली जाते की, तिच्यावरून त्यांचा जन्म अयोनिज कसा झाला हे कळते. कोरेगावात एक पाटील राहात होता. तो अतिशय भाविक व विठ्ठलाचा भक्त होता. कोणतीही नवीन वस्तू खरीदली की तो पांडुरंगाला अर्पित केल्याशिवाय उपयोगात आणीत नसे. खाण्याची वस्तू देखील अर्पित केल्याशिवाय तो खात नसे, असा त्याचा नेम होता. एका वर्षी आंब्याला अमाप पाड आला होता. पहिल्या फळांच्या ढिगातून उत्तमोत्तम सव्वाशे आंबे निवडून काढून पांडुरंगाला अर्पण करण्याकरता त्यांनी येसकर महाराबरोबर चिठ्ठी देऊन पंढरपुरी पाठविले.

येसकर महाराचे नांव सुदाम व त्याच्या पत्नीचे नाव सावित्रीबाई होते. हे दांपत्य दरवर्षी पंढरपूरच्या वाऱ्या करीत असे. येसकर सहकुटुंब सव्वाशे आंबे घेऊन पत्नी सह पंढरीच्या वाटेला लागला. हे दांपत्य पंढरपुरापासून दोन कोस अंतरावर आले होते. इतक्यात पांडुरंग वृद्ध ब्राह्मणाचे रूप घेऊन त्यांच्यापुढे उभा राहिला. त्या वृद्धाचे पाय लटपटत होते. त्याला अतिशय भूक लागली होती. तो त्या जोडप्याजवळ येवून काहीतरी खावयास द्या, असे मागू लागला. येसकर म्हणाला, माझ्याजवळ तुला खायला द्यावयास काही नाही. शिवाय मी महार व तू ब्राह्मण. माझ्या डोक्यावर आंब्याचे ओझे आहे, हे माझे नसून लोकांचे आहेत. इतके बोलून येसकर चालू लागला. सावित्रीबाईला त्या वृद्धाची दया आली. तिने टोपलीतला एक आंबा त्याच्या हातावर ठेवला. ब्राह्मण संतुष्ट झाला. त्याने तो चोखला. आंबा आंबट निघाला. म्हणून तो आंबा सावित्रीबाईस परत केला. तिला वाईट वाटले. उष्टा आंबा टोपलीत न ठेवता तिने तो आपल्या ओटीत ठेवला.

नंतर ते दांपत्य पंढरपुरास पोहोचले. बडव्यांकडे जाऊन आंबे व चिठी ठेविली. बडव्यांनी आंबे मोजून पाहिले एक आंबा कमी पडला. लगेच त्यांनी येसकरकडे विचारणा केली. सावित्रीबाईनी घडलेली हकिकत सांगितली. चोखलेला आंबा दाखविण्यासाठी ती आपल्या ओटीतील आंबा काढू लागली. चमत्कार असा झाला की आंब्याच्या ऐवजी एक सुंदर बालक सर्वांच्या नजरेस पडले. हा पांडुरंगाचाच खेळ आहे असे सर्वानाच वाटले. देवाने आंबा चोखला व प्रसाद रूपाने मूल झाले. हे समजून त्या मुलाचे नांव चोखामेळा असे ठेवण्यात आले. चोखोबांच्या जन्माची अशी ही विलक्षण लोककथा आहे.

भाविक लोकांची आजही श्रद्धा आहे की चोखोबांचा जन्म अयोनिज आहे. पंढरपुरात बराच काळ घालवल्यामुळे चोखोबाना संत संग घडला. त्यांची कीर्तने ऐकून चोखोबा बहुश्रुत झाले होते. त्यांची श्रवणभक्ती अलौकिक होती. लहानपणापासून त्यांच्यावर हरिकीर्तनाचेच संस्कार झाले. काही दिवसांनी सर्वच मंडळी कायमचीच पंढरपुरास राहावयास आली. चोखोबांचा जन्म ज्या हीन कुळात झाला त्या समाजातील लोकांची काय दुर्दशा वर्णावी. राहावयास धड घर नाही, पोटभर खावयास अन्न नाही, अंगावर अक्षरश: लक्तरे, याचबरोबर दिवस दिवस अंगाला पाण्याचा स्पर्श नाही. या प्रकारचे जीवन म्हणजे पशुपक्ष्यांचे कळपच. अठराविश्वे दारिद्रय पांघरून महात्मा चोखोबा आपल्या जीवनाची वाटचाल करीत होते. पदोपदी त्यांना अवमान सोसाव लागत असे.

त्यांचे भाग्य थोर श्री ज्ञानदेव, नामदेव यांच्या सारख्या भगवद् भक्तांची- श्री विठ्ठल भक्तांची प्रेमाची परवरण त्यांना लाभली. चोखोबांना संतसंग सतत मिळत गेला. सर्व संतानी त्यांच्यावर प्रेमाची उधळण केली. अंत्यज म्हणून जवळून श्री विठ्ठलाचे दर्शन त्याना घेता येत नसे. लांबूनच दर्शन घ्यावे लागे. तरी देखील एकदा देव बाटविला म्हणून त्यांना हद्दपार करण्यास आले. त्यावेळी चंद्रभागेच्या पलीकडील काठावर झोपडी बांधून ते राहिले. तिथे एक दीपमाळा बांधली व विठ्ठलाकडे मुख करुन भजन करू लागले. आजही ती दीपमाळा भग्नावस्थेत चोखोबांच्या भक्तीची ग्वाही देत उभी आहे.

**चोरीचा आळ -**

देवाच्या गळ्यातील रत्नहार चोरला म्हणून त्यांच्यावर आरोप सिद्ध झाला. त्यामुळे त्यांना बैलाच्या पायी बांधून मारण्याची कठोर शिक्षा झाली. परंतु विठ्ठलाने त्यांने रक्षण केले. त्या वेळापासून चोखोबा विठ्ठलभक्त म्हणून प्रसिद्ध झाले. आपला भक्त म्हणूनच विठोबा त्यांचे रक्षण करतो याची लोकांना खात्री झाली. त्यांच्यावरील निर्बंध सैल करण्यात आले. नामदेवांच्या अभंगातही बैलाच्या पायी बांधल्याचा उल्लेख आहे.

अमृत अशुद्ध झाल्याने नारद मुनींच्या सांगण्यावरुन इंद्राने ते पंढरपुरात आणून चोखोबा व सोयराबाई यांच्या करांगुळीने शुद्ध करून घेतले. यावरून चोखोबांची योग्यता काय होती हे कळते. श्री संत एकनाथ महाराजांनी आपल्या अभंगात या घटनेचे वर्णन केले आहे. तसेच चोखोबांचे घरी देव व संत मंडळी भोजन करती झाली याचे ही वर्णन नाथ महाराजांनी केले आहे. संत दरबारात चोखोबांचे स्थान अनन्य साधारण होते.

पंढरपूर व मंगळवेढे ही दोन स्थळे त्यांची कर्मभूमी होती. मंगळवेढ्याला आगळे ऐतिहासिक स्वरूप प्राप्त झाले. श्री संत चोखामेळा यांचा देहपात ख्रिस्ताब्द १३३८ साली झाला. मंगळवेढ्यास एकदा गांव कुसूचे फार मोठे काम चालू करावयाचे होते. त्या परिसरातील शेकडो महार जातीतल्या लोकांना वेढीला धरून कामास जुंपले. उतारवयात चोखोबांनाही पाचारण केल्यामुळे जावे लागले. एके दिवशी भोवतालची जमीन खणत असता किल्ल्याचा तट कोसळून त्याखाली शेकडो मजूर गाडले गेले. त्यात चोखोबा पण होते. चोखोबांचे जीवन अशा प्रकारच होते.

पांडुरंगाच्या सांगण्यावरून नामदेवांनी मंगळवेढे येथे जाऊन, ज्या अस्थिंमधून विठ्ठलनामाचा गजर ऐकू येईल, ती हाडे चोखोबांची असे ओळखून गोळा केली व पंढरीस आणली. नंतर ती हाडे देवाच्या आज्ञेने मोठ्या समारंभपूर्वक महाद्वाराजवळ समाधिस्थ केली. त्यावेळी हाडातून विठ्ठल गजर होत होता असे नामदेवांनी आपल्या अभंगातून वर्णितात. चोखोबांची ही समाधी पंढरपुरात आज एक श्रद्धा स्थान म्हणून मानले जाते.

**चोखोबांचे आत्मनिवेदन -**

एका अभंगात चोखोबा म्हणतात - यातीहीन मी महार । पूर्वी निळाचा अवतार । कृष्णनिंदा घडली होती । म्हणोनी महार जन्म प्राप्ती । चोखा म्हणे विटाळ । आम्हा पूर्तीचे हे फळ । या अभंगात चोखोबांनी आपले आत्मनिवेदन केले आहे. पूर्वी ते निळाचा अवतार असून त्यांचे हातून कृष्ण निंदा घडली. म्हणून त्यांना महार जातीत जन्म प्राप्त झाला. आपल्या मागे जो विटाळ लागला आहे, ते पूर्वजन्मीचे फळ होय.

श्रद्धावान माणूस कर्म सिद्धान्तावर विश्वास ठेवतो. कर्म बंधनातून आपली सुटका करून घेण्यासाठी तळमळत असतो. या विश्वाची घडणच अशी आहे की, कर्म न करता स्वस्थ बसणे शक्य होणारच नाही. सर्व जगच कर्माधीन आहे (कर्मानुबन्धनी मनुष्य लोके) कर्म बंधनातून मुक्त होणे आणि जन्म मृत्यूचा फेऱ्या चुकवणे म्हणजेच मोक्ष होय. जीवाला नरदेह प्राप्त झाला म्हणजे परमेश्वराने मुक्त होण्यासाठी त्याला दिलेली संधी होय. या संधीचा फायदा घेऊन आपले जीवन सफळ करावे हे उचित होय.

परमेश्वराचा हेतू न ओळखून त्या प्रमाणे वर्तन न केल्यामुळे माणसे अधोगतीस जातात.आणि जन्म मरणाच्या फेऱ्यात सांपडतात. चोखोबा वरील अभंगात आपणास महार जातीत जन्म का प्राप्त झाला हे सांगून दैवाला दोष देत बसले नाहीत. आपल्याला प्राप्त झालेल्या नरदेह संधीचा योग्य उपयोग करून ते देवाच्या श्रेष्ठ भक्तांच्या पंक्तीत जाऊन बसतात. पूर्वजन्मी काही चुका घडल्या असतील त्या सुधारण्यासाठी वर्तमान आयुष्यात सत्कर्म व भक्ती या द्वारे श्रेष्ठपणा प्राप्त करून घेतात. जीव दैवाने बांधला गेला असला, तरी कर्म करण्यास तो स्वतंत्र असतो हे ध्यानात ठेवणे आवश्यक आहे.

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष,
राम मारुती रोड,
ठाणे ४०० ६०२

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*शुनःशेप आख्यानाचा संदर्भ घेऊन केलेले विवेचन हा लेखमालेतील पुढील लेख आहे. - संपादक*

**प्रास्ताविक :**

दिशाच्या फेब्रुवारी २००८ च्या अंकात **'उध्वरेत गणपती'** ह्या अफगाणिस्थानातील मंदिरातील मूर्तीचे छायाचित्र छापले आहे. हे छायाचित्र ह्या मासिकाचे संपादक **डॉ. श्री. विजय बेडेकर** यांनी टिपलेले आहे. ते जेव्हां अफगाणिस्थानला **श्री. विनय सहस्त्रबुद्धे** ('रामभाऊ म्हावगी प्रबोधनचे डायरेकटर) यांच्या बरोबर दौऱ्यावर गेले होते, तेव्हां, त्यांना ही वास्तू आढळली.


पण, हा योगायोग विलक्षण म्हणावयास हवा !! काय बरे असावे त्याचे कारण? गणपती मूर्ती चे हे स्वरुप सर्वसामान्य नक्कीच नाही !! मग हा कोणता संकेत? कोणता योगायोग?

**ऋषी कोण ? :**

माझे एक मित्र **डॉ. श्री. धनंजय डोंगरे, (स्पिरीच्यूअल सायन्स सेंटर)** यांनी मला आणखी एक माहीती दिली. **'ऋषी'** ह्या वेदकालीन संस्कृती काळात वापरण्यात येणाऱ्या 'ऋषी' या संज्ञेचा अर्थ **'उध्वरेते' मानव** असा आहे. (स्कंद पुराणात - माहेश्वर (केदार) खंडात अध्याय २२ मध्ये हा उल्लेख आहे.)

आता 'उर्ध्वरेत मानव' म्हणजे नक्की काय? **'देवात्मशक्ति'** ह्या लेखकाचे देवासच्या स्वामी विष्णुतीर्थ महाराज यांचे काय सांगणे आहे तो पाहू या.

''कामविकारास ताब्यात ठेवल्यास ग्रंथीतून निघणारा द्रव शरीरांतच रिचविला जाऊन आरोग्य संपन्नता येते. तो द्रव उच्च प्रकारांत परिणीत होतो. अश्या लोकांना



**'उर्ध्वरेते'** म्हणतात. कारण यांचे रेत व रज अधोमार्गाने शरीरा बाहेर पडण्याऐवजी उर्ध्वाभिमुख होते.''

कां असा खटाटोप केला जातो?

''कामवासनेचे '**विवेकपूर्ण संयमन**' झाले तर तिचे सहाव्या ज्ञानेंद्रियात रूपांतर होते आणि वाढ होते. या सहाव्या ज्ञानेंद्रियाला उत्पादक कल्पनाशक्ति म्हणतात. हिलाच अंत:स्फूर्ति, दिव्यादेश, ईश्वरी संदेश अशी नांवे आहेत.

Cognitive Evolution :

पाश्चात्य देशांत मानवाच्या बुद्धीच्या विकासाचा जो एक अभ्यास चालू आहे त्याला 'Cognitive Evolution'असे नांव आहे.

त्या विकासाचे ते आर्किऑलॉजिकल शास्त्राप्रमाणे टप्पे आहेत.

त्यातील एक टप्पा '**Pleistocene**' म्हणजेच :

''From 2 million to 11 million thousand years ago extensive glaciution of the Northern hemisphere time of Human Evolution.''

जेव्हां उत्तरध्रुवावरील पर्वतप्राय हिमनग वितळून जलप्रलय झाला त्या काळातील 'मानवी उत्क्रांति'चा काळ हा होय.

**काय महत्त्व ह्या काळाचे ? :**

त्यांच्या शास्त्राप्रमाणे माणूस जेव्हां स्वत:च्या अस्तित्वाचे व जगाच्या अस्तित्वाचे सत्य जाणण्याचे प्रश्न स्वत:लाच विचारूं लागला तो हा काळ असा प्राप्त अर्थ होय. हा टप्पा ह्या प्रलयानंतरचा असे त्यांना वाटते. काळाची गणना ह्या पृथ्वीवरच्या स्थित्यंतरावर अवलंबून दिसते आहे.

**कुंडलिनी जागृती :**

मग, आतां लक्षात येईल कीं **'उर्ध्वरेते ऋषी'** ज्यांनी **ईश्वरनिश्वसित ज्ञानाबरहुकूम** जगाच्या व सृष्टीच्या निर्मितीचे रहस्य आपल्या दिव्य कल्पनाशक्तीने जाणले व त्याचेच ज्ञान **'वेद संहितेत'** रूपांतर केले त्या बुद्धीच्या सामर्थ्याचे रहस्य त्यांच्या 'उध्वरेते अधिकारांत अवतरलेले सांपडेल.

ह्या क्रियेने 'कुंडलिनी शक्ती' जागृत होते व त्या योगे सर्वसामान्य मानवी बुद्धीच्या कक्षेबाहेर असलेल्या गूढ ज्ञानाचे रहस्य उलगडते. 'मानवी इंद्रिय ज्ञाना' पलीकडले...॥

**भारतीय ज्ञानाची दिशा :**

आतां स्वत:च्या आत्म्याचे ज्ञान व त्या आत्म्याला बध्द करणाऱ्या पाशांपासून मुक्तता मिळवणाऱ्या ऋग्वेदांतील ''**शुन:शेप**'' आख्यानातील मानवाची धडपड कोणत्या विशेष ज्ञानाच्या लाभाची व पातळीची आहे, याचा विचार करा. 'दिशाच्या' फेब्रुवारी २००८ च्या अंकात या ऋग्वेदातील आख्यानाचे वर्णन केले आहे.

त्यामुळे मानवी बुद्धीला ह्या अगम्य अतींद्रिय ज्ञान पद्धतीचा शोध व मागोवा ह्या **'कुंडलिनी जागृती'** व **'उर्ध्वरेत क्रियेत'** आहे. अफगाणिस्थान मधील या मंदिराच्या अस्तित्वावरून हे सिद्ध होते कीं 'भारतीय संस्कृतीमध्ये ह्या ज्ञानपद्धतीच्या तंत्राचा शोध इतक्या पुरातन काळांत लागलेला होता. स्वत:च्या अस्तित्वाच्या सत्यतेबद्दल प्रश्न व त्याचा मागोवा घेण्याचा मानवी प्रयत्न!!

त्याचे आणखी दोन पुराने 'Kundalini in Time and Space' ह्या श्री. गोपी कृष्ण ह्या काश्मीरी योग्याच्या प्रसिद्ध पुस्तकांतील फोटोवरून सांपडतील. त्यातील एक आहे. 'मोहोंजोदारातील' व दुसरा आहे. 'शिव पार्वती' जोगेश्वरी मंदिरातील.

**सोम म्हणजे काय? :**

ह्या पुढील क्रिया ही 'सोमयाग व सोमरस' प्राप्तिची आहे. आपण शुन:शेप आख्यानात ह्याचा उल्लेख पाहिला होता. राजसूय यज्ञ व 'अंजसव' म्हणजे सोमरसाची प्राप्ति. (ऋग्वेद १/२८/५-८)



Picture No. 2



Picture No. 3

**<u>योगी गोपीकृष्ण व कुंडलिनी रिसर्च :</u>**

त्या अगोदर **<u>योगी गोपीकृष्ण</u>** काय म्हणतात व कोणत्या महत्त्वाच्या गोष्टीकडे लक्ष वेधतात ते पाहाणे प्रस्तुत ठरेल. गोपीकृष्ण होते एक विलक्षण काश्मीरी गृहस्थ. भ्रुमध्यावर दृष्टी केंद्रित करून तीन तीन तास योग साधना केल्यानंतर १७ वर्षांनी त्यांची 'कुंडलिनी शक्ति' ('शक्तिपाताविना व गुरूच्या मार्गदर्शना खेरीज) जागृत झाली. त्यांचा त्यांना पुष्कळ त्रासही झाला. पण त्यांच्या व्यक्तिगत अस्तित्वात 'दैवी', 'क्रांतिकारी बदल' झाला. (डिसेंबर १९३७) त्यांनी काश्मीरला श्रीनगर शहराच्या बाहेर '**<u>निशात</u>**' येथे '<u>Kundalini Research Institute</u>' स्थापन केली. नंतर **<u>न्यूर्योर्क, अमेरिका</u>** येथेही अशीच एक संस्था स्थापन केली. अनेक पुस्तके लिहीली.

त्यांचा विश्वास काय होता? (ते आतां हयात नाहीत)

"Gopi Krishna believes that planted in human beings is a powerful reservoir of psyehicenergy which, when roused to activity in the state of Kundalini, can lead to transcendental states of consciousness, genius, and Supernormal psychic powers."

<u>In the state of kundalini the reproductive system recoils on it self and transters energy to the brain,</u>

<u>Human Consciousness</u> **<u>व कुंडलिनी</u> :**

ह्या कुंडलिनी जागृतीचा आजच्या जगाशी काय संदर्भ ?

''Gopi Krishna believes that we are presently in the midst of a world - wide - though often misunderstood - process of evolution to a higher state of consciousness.''

**भारतीयांचा परकीय चष्मा :**

पण, ह्या क्रियेचा संस्कृतिक वारसा प्रत्यक्षपणे ज्या भारतीय समाजाला कांही संप्रदायामार्फत प्रत्यक्ष प्राप्त झालेला आहे, त्यांना तिकडे लक्ष द्यावेसे वाटत नाही. हे

मोठे दुर्दैव आहे !! ह्या वैश्विक सत्याकडे स्वत:च्या सामाजिक संस्कृतीतील हा एक अत्युच्च बिंदू, असे ते पहात नसून पाश्चात्यांच्या भौतिक विज्ञान व संस्कृतीच्या 'आभिनिवेशी एकांगी पॅरॅडिम' चष्म्यातून बघताहेत. हे एक 'Myth' आहे, व ऋग्वेदातील आख्यानामार्फत संगितलेल्या शुन:शेपाच्या विलक्षण अलौकिक प्रयत्नांकडे ते अविश्वासाने पहात आहेत !!

अशातऱ्हेच्या विकृत दृष्टीने 'भारतीय वेदिक, योगिक, तांत्रिक ज्ञानभांडारामध्ये व त्यावरील स्वत:च्या अधिकाराचे बिल्ले दाखवणारे अनेक विद्वान फार मोठा गोंधळ व गैरसमज प्रसृत करण्यांत दंग झालेले आहेत.

**सोमरस व आर्य वेदिक संस्कृति :**

त्यांचेच काही नमूने आता आपण 'सोम' व 'सोमयाग' ह्या दोन संकल्पनांच्या अभ्यासात बघणार आहोत.

ठाण्याला जेव्हां जवळजवळ दोन वर्षापूर्वी राष्ट्रपती पुरस्कारित डॉ. सिंधुताई डांगे यांचा सत्कार झाला त्यावेळी त्यांनी 'वेदकाळातील समाज' ह्या सारख्या विषयावर व्याख्यान दिले होत, तेव्हां मी हजर होतो. त्यांच्या सांगण्यात असे दिसले कीं आर्य वैदिक काळातील समाज ज्या प्राथमिक स्वरूपाच्या सामाजिक स्थितीत जीवन कंठित होता त्यांत तो 'सोमपानाच्या रसपानाचा' स्वाद घेत असे. हा सोमरस त्याला गांवाच्या (वस्तीच्या) बाहेर असलेल्या डोंगरमाथ्यावर वाढलेल्या सोमवल्लीपासून प्राप्त करावा लागे. त्या कृतींचे त्यांनी थोडे सविस्तर वर्णनही केले. पण, आर्य सोमरसपान करीत असत याचा नक्की अर्थ कोणता?

**पवमान सूक्त व अस्यवामयि सूक्त :**

आतां 'पंचसूक्त पवमान', (वौदिक सूक्तमाला --- २) या महामहोपाध्याय विद्यानिधी डॉ. सिध्देश्वर शास्त्री चित्राव ह्यांच्या पुस्तकांत ते काय लिहीतात ते पाहू या.

<u>परमेश्वर स्वरूपी सोम :</u>

''ऋग्वेदाच्या नवममंडलातील कांही सूक्तांमध्ये सोमास साक्षात् परमेश्वर स्वरूप मानून त्याच्या 'आध्यात्मिक श्रेष्ठतेचे वर्णन केलेले दिसते. त्याला पृथ्वी, इतकेच नव्हे तर समस्त विश्व सोमाने निर्मिल्याचा निर्देश तेथे पुन:पुन्हा आढळते. (ऋ. ९,८६,९६-९७)

पृथ्वीतील औषधी, गोदुग्ध आणि जाल हे तीन अमृतप्रवाह सोमाने निर्माण केल्याचा निर्देश या सुक्तातील निम्नलिखित मंत्रामध्ये आढळतो.''

**त्वमिमा औषधी : सोम विश्वास्त्वमपो**
**अजनयस्त्वं गा: ।**
**त्वमा ततन्योर्वन्तरिक्षं त्वं ज्योतिषा वि तर्मो ववर्थ ॥**
**(ऋग्वेद १.९१.२२)**

(पृथ्वीतील वनस्पती, जलधारा, आणि धेनू हे तीन अमृतप्रवाह उत्पन्न करणाऱ्या हे सोमा, विस्तीर्ण अंतरिक्षाचा पसारा तूंच मांडला असून, तमोव्याप्त आकाश तूंच सुप्रकाशित केले आहेस.)

सोम म्हणजेच पौराणिक अमृत :

**<u>श्येन पक्षाने</u> (गरूड)** स्वर्लोकीचा सोम पृथ्वीलोकी आणल्याचा आणि त्यामुळेच <u>सोमाला</u> **<u>'श्येनामृत'</u> <u>(श्येन पक्षाने आणलेला)</u>** ही उपाधी प्राप्त झाल्याचा निर्देश ऋग्वेदात अनेक ठिकाणी आढळतो. (ऋग्वेद १.७ ०, २:८, ९६,३)

ह्या पुढील त्यांचे भाष्य महत्त्वाचे !! '' यावरून वैदिकोत्तर काळात सोमाचे मदकारक पेय हे स्वरूप मागे पडून त्याच्या आध्यात्मिक शक्तीवर अधिक जोर दिला जाऊ लागला, असे दिसते.

**<u>दोन पातळ्या भौतिक, आध्यात्मिक :</u>**

तेव्हां 'सोमं' व 'सोमरस' ह्या दोन संकल्पना एकदा **<u>भौतिक</u>** (**<u>व्यावहारिक, पृथ्वीतलावरील</u>**/ वरील) **<u>पातळीवर</u>** तर एकदां '**<u>आध्यात्मिक पातळीवर</u>**' बघण्याचा प्रयत्न दिसतो आहे खरे, म्हणावयाचे तर हा **<u>वैचारिक गोंधळ</u>** आहे असे सहज दिसेल. पातळी फरकांची जाणीव आहे कां? त्यामुळे भाषेचे, संकल्पनांचे, साधनांचे अर्थ व व्याप्ति बदलते.

**<u>संकल्पनांचा गोंधळ :</u>**

कां होतो आहे हा गोंधळ? किंवा, कां या 'दोन पातळ्यावर' बघण्याच्या प्रयत्नांचा अर्थ? काय असावे, ह्या दोन दृष्टीमधील, दर्शविणाऱ्या **<u>प्रत्यक्ष कृतीचे सत्य</u>** व **<u>परस्परसंबध</u>** ?

<u>ही उत्तरे कोणीही विद्वान देण्याचे प्रयत्न करीत नाहीत. कां</u>? यांचे उत्तर नंतर शोधूच ! पुढे तेच शास्त्री काय म्हणतात ते पाहू या.

''<u>सोमसुक्तांचा आध्यात्मिक अन्वयार्थ प्रतीकोपासना सूक्त.</u>'' :

''धर्मचक्षुंना दृग्गोचर होणाऱ्या चराचर सृष्टीचे कोडे सोडवण्याच्या तळमळीने रचलेले **<u>दीर्घतमस औचथ्य ऋषिकृत</u>** '**<u>अस्य वामीय सूक्त</u>**' आणि गाळल्या जाणाऱ्या सोमरसाचे नाना परींनी स्तवन करणारी 'पवमान सुक्ते' ही दोन्ही 'पंचसुक्त पवमान' मध्ये **<u>श्री विष्णु - अभिषेकार्थ</u>** संग्रहित केलेली आढळतात. सकृत दर्शनी सर्वस्वी भिन्न विषयांवरील वैदिक सुक्तांचे हे संकलन कोणते सूत्र मनाशी धरुन केले असावे, ते प्रथम दर्शनी समजत नाही. परंतु ऋग्वेदाच्या पवमान सुक्तातील '**<u>पवमान सोम</u>**' हा व्यापक अर्थाने अनादि अनंत **<u>परमेश्वराच्या सृष्टीनिर्मात्या आणि सृष्टिसंचालन शक्तिचे प्रतिक</u>** आहे आणि या विशिष्ट दृष्टीने ही सारी सूक्ते गूढ अर्थाने अनादि अनंत परमेश्वराचे स्तवन करणारी <u>प्रतीकसूक्ते</u> आहेत, हे गुह्य तत्व ध्यानी धरल्यास, ही सारी सूक्ते **<u>सृष्टि</u>** **<u>संचालनाची</u>** प्रेरक शक्ती मानलेल्या श्रीविष्णूच्या **<u>अभिषेकासाठी</u>** कां म्हणाली जातात, याचा उलगडा होतो.''

**<u>दृश्य प्रतीकांची भाषा :</u>**

''कुमारस्वामी यांचे मते तत्वज्ञानाची परिभाषा सांकेतिक शब्दांनी (Jargon) तव्दत वौदिक अध्यात्मशास्त्राची परिभाषा सृष्टीमध्ये प्रत्यही आढळणाऱ्या दृश्य प्रतीकांनी बनलेली असते. ही दृश्य प्रतीका आधारित परिभाषा समजून घेणे, हे वेदिक मंत्रांच्या गूढार्थ निष्पत्तींच्या दृष्टीने अगत्याचे ठरते. वैदिक शब्दब्रह्माची गूढता अशी मांडली जाते.

**शब्दस्थ हि ब्रह्मण एषा, पन्था**
**यन्नामाभिरध्यायति धरि पार्थः ।**

**परिभ्रमन् तत्र न विन्दतेऽर्थान्**
**मायामये शयानः ॥**
**(भागवत, २.२.२)**

''वेदिक मंत्रांचा गूढार्थ हा त्यातील शब्दाच्या शब्दकोशीय अर्थाहून सवस्वी वेगळा दिसतो. म्हणूनच केवळ शब्दार्थांच्या अनरोधाने वैदिक मंत्राचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केल्यास साधकांच्या मनांत अर्थाऐवजी अनर्थ उत्पन्न होण्याची शक्यता अधिक असते.

**'परोक्ष' म्हणजे प्रतीकात्मक :**

गोपथ ब्राह्मणमते वैदिक साहित्याची ही प्रतीकात्मक परिभाषा 'परोक्ष' (शब्दशः अर्थ - 'दूरान्वित') नांवाने सुविख्यात असून 'गुह्यात् गुह्यतमं' अशी ही अवगुंठित परिभाषा साक्षात देवांनाही उघड्यावागड्या अवगुंठारहित शब्दयोजनेपेक्षा अधिक आवडते.

**परोक्षप्रिया इव हि देवा भवन्ति, प्रत्यक्ष व्दिषः। (गो.ब्रा. १.१.७)**

**<u>निदान विद्या</u> :**

''वैदिक साहित्यातील प्रतीकात्मक परिभाषेचे हे शास्त्र 'निदान विद्या' नावाने ओळखले जाते. सृष्टीतील हरएक दृश्य वस्तूच्या अंतरंगात सृष्टि विज्ञानाशी संबंधित असे एक 'गहनगूढ रहस्य' दडलेले आहे. ते शोधून काढणे हे निदान विद्या शास्त्राचे आद्य उद्दिष्ट आहे.''

**<u>दृश्य प्रतीकांचे उद्दिष्ट</u> :**

''अनादि अनंत असे विश्व आणि त्यास अधिष्ठानभूत असे मन, प्राण आणि जड सृष्टी यांच्या निर्मीतीची प्रक्रिया वर्णन करण्यासाठी हीच एक परिभाषा त्यांना चपरुवल बसणारी वाटली.''

**''<u>या परिभाषेतील प्रतीके नित्य प्रचारातील असल्याने कोणत्याही काळातील व देशातील वाचकांना त्याची ओळख सहज पटते</u>.''**

यापैकी हरएक वाचक स्वतःच्या बौद्धिक आणि सामाजिक अनुभव विश्वानुसार या प्रतीकाचा अर्थ स्वतःच्या बुद्धीला झेपेल त्यानुसार लावतो, आणि अशा तऱ्हेने वेदांच्या सकृदर्शनी साध्यासरळ वाटणाऱ्या मंत्रातून भौतिक, आत्मिक, आध्यात्मिक अशा नानाविध अर्थाचे **<u>इंद्रधनुष्य</u>** जिज्ञासू साधकाला अथवा अभ्यासकाला गवसते.''

डॉ. चित्राव शास्त्री यांच्या भाष्याचा मुख्य भाग त्यांच्याच शब्दात मुद्दामच वरप्रमाणे दिला आहे कां?

कारण ह्या पुढे आपण जे खरे अर्थ 'अस्यवामीय सूक्त' (सृष्टिनिर्मीती) व पवमानसूक्त (सृष्टिनिर्मीतीतील एक रहस्य) ह्या विष्णू देवताच्या यज्ञसंस्कृतीच्या संभारातून लावणार आहोत, त्याची थोडीशी उपयुक्त पार्श्वभूमी माहीती असावी म्हणून.

थोडी आणखी एक माहीती आवश्यक आहे, ही माहीती देखील वेदिक ज्ञान पद्धती संबंधीच आहे.

विश्वरचनेसंबंधी नानाविध उपपत्ती पद्धतींना ऋग्वेदात 'विद्या' अशा व्यापक नावाने संबोधिले जाते. ह्या नानाविध ज्ञानाच्या विशेष पातळीवरील वैदिक अर्थांच्या विद्या खालील प्रमाणे :-

| विद्यांचे प्रकार | पातळीची भूमिका |
|---|---|
| १) अधिभूत विद्या | जडसृष्टीची पातळी |
| २) अधदैवत विद्या | दैवी शक्तींची पातळी |
| ३) अध्यात्म विद्या | मानवी शरीर प्रक्रिया पातळी |
| ४) अधियज्ञ विद्या | याज्ञिक पातळी |
| ५) अधिप्रज विद्या | मन, जीवन व जडसृष्टी यांना पिता, माता आणि बालक मानणारी पातळी |
| ६) अधिलोक विद्या | प्राणाचे अजरामर विश्व आणि जडसृष्टीचे मर्त्य विश्व यांची एकात्म आणि परस्परावलंबित्व |
| ७) आधिविद्या | मानवी जीवनाच्या आणि ज्ञानाच्या परमोत्कर्ष-बिंदूस्वरूप परलोक ज्ञानांचे वर्णन करणाऱ्या उपपत्तीची पातळी |

वेदिक साहित्यात निर्देशिलेल्या एकंदर **१३२** विद्या आहेत. ह्या विद्यांची यादी मुद्दाम इथे जोडतो आहे. ह्या गूढ विद्या आहेत व त्यांना प्रत्येकाची विशिष्ट परिभाषा आहे.

वैदिक साहित्यात निर्देशिलेल्या १३२ विद्या

(वेदिक साहित्यात निर्देशिलेल्या १३२ गूढ विद्या (पारिभाषिक शब्दात वर्णिलेल्या ज्ञानशाखा) अकारादि क्रमाने खाली दिल्या आहेत.)

१. अक्षर विद्या
२. अग्नि विद्या
३. अग्नीषोमीय विद्या
४. मन विद्या
५. अथर्व विद्या
६. अदिति विद्या
७. अपराजिता विद्या
८. अमृतमृत्यू विद्या
९. अम्भो विद्या
१०. अर्णव विद्या
११. अश्वत्थ विद्या
१२. अश्वमेध विद्या
१३. असुर विद्या
१४. अहोरात्र विद्या
१५. आज्य विद्या
१६. आत्मन्वी विद्या
१७. आदित्य विद्या
१८. आप्री विद्या
१९. आभू-अभ्व विद्या
२०. आम्भृणी विद्या
२१. आयुष्टोम विद्या
२२. इध्म विद्या
२३. इन्द्र विद्या
२४. इष ऊर्ज विद्या
२५. उखासंभरण विद्या
२६. उर्वशी विद्या
२७. ऋत सत्य विद्या
२८. ऋतु विद्या
२९. ऋत्विक विद्या
३०. ऋषि विद्या
३१. कर्म विद्या
३२. क्षर विद्या
३३. गणपति विद्या
३४. गन्धर्व विद्या
३५. गायत्री विद्या
३६. गुहा विद्या
३७. गृहमेध विद्या
३८. गो विद्या
३९. गोपा विद्या
४०. गोष्टीम विद्या
४१. ग्रह विद्या
४२. चमन विद्या
४३. चमस विद्या
४४. चित्र शिशु विद्या
४५. छन्दो विद्या
४६. जातवेदो विद्या
४७. ज्योतिष्टोम विद्या
४८. तपो विद्या
४९. तानूनप्त्र विद्या
५०. तिस्त्रो देवी विद्या
५१. त्रय: केशिन विद्या
५२. त्रिपुर विद्या
५३. त्रिबिक्रम विद्या
५४. त्रीणि ज्योतींशी
५५. त्रैताग्नि विद्या
५६. त्वष्ट्र विद्या
५७. दक्ष विद्या
५८. दक्षिणा विद्या
५९. दर्शपौर्णमास विद्या
६०. दिक् स्वस्तिक विद्या
६१. देव विद्या
६२. देवरथ विद्या
६३. देवासुर विद्या
६४. दैव्याहोतारौ विद्या
६५. द्यावापृथिवी विद्या
६६. द्रोणकलश विद्या
६७. धर्म विद्या
६८. नाक विद्या
६९. नारायण विद्या
७०. परमेष्ठी विद्या
७१. परावर विद्या
७२. पर्य विद्या
७३. पवमान विद्या
७४. पशु विद्या
७५. पितृ विद्या
७६. पुरुष विद्या
७७. पृष्कर विद्या
७८. प्रजापति विद्या
७९. प्रतिमा विद्या
८०. ब्रमा विद्या
८१. प्राण विद्या
८२. ब्रह्म विद्या
८३. ब्रह्मणस्थान विद्या
८४. ब्रह्मोदन प्रचरव विद्या
८५. बृहस्पति विद्या
८६. मनु विद्या
८७. मरुदगण विद्या
८८. महिमा विद्या
८९. मातारिश्वन विद्या
९०. मिबाबरुण विद्या
९१. यक्ष विद्या
९२. यज्ञ विद्या
९३. यज्ञ ओपश विद्या
९४. यम विद्या
९५. रजो विद्या
९६. राज विद्या
९७. रायि विद्या
९८. रुद्र विद्या
९९. गेदसी विद्या
१००. लोक विद्या
१०१ वसुन विद्या
१०२. वराह विद्या
१०३. बफ्टकार विद्या
१०४. बमुविद्या
१०५. बाक् विद्या
१०६. बाज विद्या
१०७. बिराज विद्या
१०८. विश्वकर्मा विद्या
१०९. वेन विद्या
११०. व्योम विद्या
१११ शकट विद्या
११२. शाङ्करी विद्या
११३. शिपिविष्ट विद्या
११४. शुक्रसृष्टी विद्या
११५. संवत्सर विद्या
११६. सदसद् विद्या
११७. सप्ततंतु विद्या
११८. समस्वस् विद्या
११९. समुद्र विद्या
१२०. सरस्वती विद्या
१२१. सलिल विद्या
१२२. साकंजप्राण विद्या

*कोडियाचे गोरेपण । तसे अहंकारी ज्ञान - तुकाराम महाराज*

१२३. सावित्री विद्या १२४. सुपर्ण विद्या
१२५. सूर्य विद्या १२६. सूर्या विद्या
१२७. सोम विद्या १२८. स्तोम विद्या
१२९. स्वधा विद्या १३०. स्वयंभू विद्या
१३१. स्वाहा विद्या १३२. हृदय विद्या

पण, माझा प्रश्न आहे. तो वेगळाच आहे.

**Constitutional Responsibility about culture :**

भारतीय राज्य घटनेमध्ये सांस्कतिक ज्ञानाची जपणूक व संवर्धन करण्याची जबाबदारी राज्यशासनाची आहे. मग, शिक्षण खात्यात चालणाऱ्या शाळा, कॉलेजेस व युनिव्हर्सिटी तशाच संशोधन संस्था ह्यामध्ये ह्या अत्यंत महत्त्वाच्या शास्त्रीय ज्ञानाचा समावेश व पाठ पुरावाच केला जात नाही? **<u>भारताच्या संस्कृतीतील अतीशय महत्त्वाच्या अश्या वेदिक अध्यात्मशास्त्राचा गूढ अर्थ उकलण्याकरितां एवढेंच नव्हे तर 'मानवी अस्तित्वाला' दैवी अधिकार प्राप्त करून देणाऱ्या माहीती व ज्ञानाबद्दल ही उदासीनता कां?</u>** ही जबाबदारी भारतीय संविधानतील राजसत्ता सातत्याने नाकारत आहे किंवा दुर्लक्ष करीत आहे. याची खंत कुणालाच वाटत नाही असे दिसते आहे.

**<u>आत्म्याचे पाश</u> :**

पुन्हा एकदा आपल्या विषयाकडे वळूं या. शुन:शेपला आपल्या आत्म्याला जे 'पाश' आहेत ते जाणून घेऊन त्यापासून मुक्तता मिळवायची आहे. हा प्रश्न प्रत्येक मानवी जीवाला ह्या पृथ्वीवर पडावयाला हवा. आणि असा जर पडला तर भारतीय वेदिक संस्कृतीत वर्णन केलेल्या एका 'कहाणी'मध्ये ('आख्यान') जी धडपड वर्णन केलेली आहे. ती ऋग्वेद सारख्या सत्यज्ञान जतन केलेल्या जबाबदार संहितेत सांठवून ठेवलेली आहे. आता ह्यामध्ये जरी कांही दुर्बोधिता असली, तरी त्याचे निवारण करून त्यांतील शास्त्रीय ज्ञान, व्यवहारामध्ये प्राप्त करणे हे आपले महत्त्वाचे (वैश्विक महत्त्वाचे) काम आहे. त्यांतील साधना व यज्ञक्रिया यांची पुरेशी व थोडी अनाकलनीय माहिति देखील प्रयत्नपूर्वक उलगडून पहाणे अत्यंत आवश्यक ठरावे.

**<u>गमावलेली इच्छाशक्ती</u> :**

इथे मुख्य प्रश्न येतो तो म्हणजे ही **<u>योग्य ज्ञानदृष्टी व इच्छाशक्ती</u>** मिळवण्याचा !! कारण, ज्या पातळीवर ह्या शुन:शेपाच्या धडपडी आहेत त्या केवळ भौतिक पातळीवर किंवा जड शरीराअंतर्गत क्रिया नाहीत.

सध्याच्या समाजाच्या ज्ञानात एकच पातळीची क्षमता प्राप्ति धडपड दिसते. ती म्हणजे भौतिक जड पातळी, इंग्रजी भाषेत भौतिकवादी म्हणजे Materialistic Level. ह्या पातळीमध्ये सर्वसाधारण जन्मजात इंद्रियांची क्षमता व बुद्धीची (भौतिकवादी) पातळी पुरी पडते. पण, मी वर उल्लखलेल्या विद्या कमवण्याकरितां व त्यांत सिद्धि मिळवण्याकरितां अनेक निरनिराळ्या पातळीवर जावे लागते. ही क्षमता नैसर्गिकपणे या युगात तरी प्राप्त होताना दिसत नाही. कांही व्यक्तींना केवळ योगाने, तपस्येने कुंडलिनी जागृतीने किंवा पूर्वजन्मीच्या सुकृतामुळे (साधनेमुळे) प्राप्त झालेली आढळेल. पण, पुढे त्यांच्याच संप्रदायांतही अनुयायांना केवळ संप्रदायांतील दीक्षासंप्रदाय अधिकारांतही मिळालेली दिसत नाही. त्यांचा **<u>'अविर्भाव'</u>** **<u>फसवा</u>** असलेला आढळेल. याचा अर्थ ह्या काही केवळ '**<u>जन्मसिद्ध क्रिया</u>**' नव्हेत.

**ह्याचे कारण ह्या पातळींची जी चढती श्रेणी आहे ती मानवी काँशनेसच्या उन्नतीची मागणी करते आहे**. ही एक Hierarchy ladder आहे. ती चढण्याची जीवात्म्याची (consciousness) धडपड आणि तपस्या आज नाही !! त्याची जाणीव नाही !! ह्या साधना केल्या जात नाहीत !! तेव्हा या क्रिया सुलभ होण्यासाठीच, हा जन्म व प्रकृती, समाज, जीवसृष्टी, ग्रहतारे यांची योजना

आहे. पण, हे 'विश्वास' कांही भल्या बुऱ्या तत्वज्ञानांच्या चुकीच्या प्रभावाखाली नष्ट करण्यात आला आहे. ह्या पृथ्वीकडे, जीवनाकडे एकतर फक्त भौतिक जीवन उद्दिष्टे व भोग ह्या दृष्टीने बघणे चालू आहे किंवा 'निवृत्तीपर' विश्वासाने, हर जग 'माया' आहे असे मानून ही 'जीवनसंधी' गमावण्यात लोक गुंतले आहेत.

अनेक प्रचलित 'लौकिक धर्म' असा चुकीचा मार्ग सांगत आहेत. किंवा निराळ्या प्रकारांचे भ्रम निर्माण करून केवळ परस्पर 'धर्मसंघर्षाचे' आदेश देत आहेत.

**सोमरसाचा वैश्विक अर्थ :**

आतां पुन्हा एकदा 'सोमरसाच्या प्राप्तीकडे एका अधिकारी व्यक्तीचे मार्गदर्शन काय आहे ते पाहू या. देवासाचे स्वामी विष्णुतीर्थ महाराज म्हणतात -

''हिंदू तत्वज्ञ अति सूक्ष्म द्रवरुप जो अपस् नामक पदार्थ, त्यापासून सर्व शरीरे बनली आहेत असे मानतात. **''अप्सु मे सोमो अब्रवीत।''**

तेजोमयांचे घटना सिद्धांतानुसार असें समजले जाते की सर्व तारे व ग्रह यांची पूर्ण घटना होण्याच्या अगोदरच्या स्थितीत ते तेजोमेयरूपाचे दिसते. त्यांची घटना अशा एखाद्या पदार्थापासून झाली की कदाचित तो प्राण असावा.''.....

''श्रद्धा हा शब्द अपस् द्रवाबद्दल असून आर्द्र स्वरूपाचा आहे. **यज्ञाग्नींत पडणारे सारे हविद्रव्य हे या अपस् द्रवात परिणत होते. यांज्ञिकांच्या श्रद्धारूपी मानसिक शक्तीने वर दिव्य लोकास जाते.** आपली सारी महान् व उदात्त सत्कार्ये, प्रार्थना व श्रद्धापूर्वक होमांत टाकलेल्या आहुती आपल्यापासून या अपस् द्रवाच्या द्वारा दिव्य लोकांपर्यंत पोचतात. पृथ्वीपासून किमान अंतरावर असलेला **चंद्र हा पृथ्वीचा दैवी उपग्रह हे अपस् द्रव्य आकर्षून त्याचे सोमांत रूपांतर करतो**. हा सोम पृथ्वीच्या विजेने भारलेल्या वातावरणांत पर्जन्यरूप होतो. मग मेघरूप होतो. मग, वृष्टि होते. अश्या रीतीने **सोम वनस्पतीत रसाचें रूप घेतो. प्राणिमात्राचें अन्न होऊन सरतेशेवटी सप्त धातूने वीर्य बनतो**. यावरून आपल्या शरीरांत प्राण द्रवाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.''

पुढे ते काय वर्णन करतात ते पहा. या वर्णनाच्या पाठीमागे त्यांच्या स्वत:च्या अनुभूतींचे प्रमाण आहे असे मला खात्रीपूर्वक वाटते.

**''श्रद्धा हा मानसिक धर्म आहे.'' ''प्राणमय कोशाच्या, मध्यस्थीने हे कार्य चालते.''** याचे प्रवाह वाहताना योग्याला समजतात. अधोगतीस जाणाऱ्या **वीर्याचा प्रवाह उर्ध्वाभिमुख करून** योगी ते **सोमांत परिणत** करतो. अशा रीतीने तो प्राणमय कोशावर जय मिळवतो.

असा योगी स्वेच्छापूर्वक अन्नमयकोष आणि प्राणमय कोष म्हणजेच **स्थूल व सूक्ष्म शरीर यांची तोड - जोड करुं शकतो.**

**पिंडात सोमरसाची प्राप्ति :**

''आंतरिक पंचविध उत्क्रांतिविषयक व्यूत्क्रम म्हणजे प्रातिप्रसव वीर्यापासून सोमापावेतोचा खालीलप्रमाणे आहे.

प्रथम स्थितीत वीर्याचा स्वशरीरातील विरुद्ध लैंगिक द्रव जो रज त्यात निक्षेप होतो. हे रज गुदद्वार व पुरुषाचे लिंग यांचेमधील स्नायूत असतो. त्याठिकाणीं ही दोनही एकत्रित झाल्यावर उष्णता उत्पन्न होते. त्या उष्णतेने त्या वीर्याचे रुपांतर सूक्ष्म द्रवात होते. तो द्रव शरीरातील विविध ग्रंथीत शोषला जात असावा असें दिसते. त्यापासून एक प्रकारची विद्युतशक्ती तयार होते. तिला व्यक्तीगत विद्युत म्हणजे **'ओज'** म्हणतात. ते ओज मुलाधारांत एकवटून वंशरज्जूतून वर चढते. येथे हा वंशीय मार्ग बाहेरील वातावरणाच्या सूर्यमंडलाचा (सुषुम्णा) भेद करणाऱ्या

मार्गासारखा आहे.

या ठिकाणी सूर्यद्वार यांचा अर्थ सुषुम्णा असा दिलेला आहे. (योगदर्शन पाद ३ सूत्र २६ वरील वाचस्पती मिश्रांची टिका पहा. ''**सूर्याव्दारे सुषम्णाया नाड्याम्**'') नाभिभेद हे सूर्याचे स्थान असून ते खाली तोंड करुन विष ओकत आहे असे समजतात.

परिणामी ते उर्ध्वमुख होते आणि त्यातून सोम निघूं लागतो.

म्हणजे असे कीं **वंशस्थ विजेने त्यातून सोम वेगळा होतो. सोम वर चढून मस्तुकांत जातो. मस्तुक हे चंद्राचे स्थान आहे**. ते आकाशसदृश आहे. त्या ठिकाणी **सोमाचे अपस् द्रवात रुपांतर होते**. म्हणून सोमाचे स्थान भूमध्य आहे.

**अंतरिक्षगतो वान्हि वैद्युत: स्वान्तरात्मक:।**
**नमस्य सूर्यरूपो अग्नि: नाभिमष्डलमाश्रित:।।**

**वियं वर्षति सूर्योऽसौ रस्रच वत्यमृतमुन्मुख:।**
**तालुमूले स्थितउचन्द्र:सुधावर्षत्यक्षोमख:।।**

**योगशिखा उपनिषद (३२,३३)**

**सोमरस व गुन:शेप आख्यान :**

तेव्हां दिशाच्या फेब्रुवारी २००८ च्या अंकात पान ३७ वर ज्या यज्ञाचे वर्णन अत्यंत त्रोटक पद्धतीने ऋग्वेदातील कांही ऋचांमध्ये आढळते, त्याच्या पाठीमागे ही एवढी गूढ व गुंतागुंतीची 'सोमरस' पिंडात निर्माण करण्याची क्रिया आधारभूत आहे.

ऋग्वेदात याचे सविस्तर वर्णन कां नाही? अनेक उत्तरे? याचे उत्तर कदाचित ह्या क्रिया व योगसाधना यज्ञक्रिया ह्या समाजांत सर्वसाधारण ज्ञान ह्या स्वरूपांत अस्तित्वात असल्या पाहिजेत. हे ज्ञान गृहीत धरून आख्यान सांगितले गलेले असावे. किंवा, जर ह्या मानवी समाजाला हे ज्ञान अजूनही प्राप्त झालेले नाही अशी स्थिती असल्यास ह्या सूचक मार्गदर्शनाने ह्या क्रिया प्राप्त करतां येतील. ह्यापेक्षा सुद्धा निराळ्या इतिहासाची शक्यता नाकारता येणार नाही.

कदाचित, हा वेदिक समाज दुसऱ्या ग्रहावर, ताऱ्यांवर अस्तित्वात असेल व ह्या पृथ्वीवरील मर्त्य मानवी जीवनाच्या उत्क्रांतीसाठी हे ज्ञान सांगण्यासाठी ऋषी, मुनी ह्यांनी अवतार घेतला असेल.

**भारतीय संस्कृतीतील अस्पष्ट खुणा :**

पण, एक गोष्ट नक्की कीं ह्या गुंतागुतींच्या व अनेक स्तरावरच्या, भिन्न भिन्न ज्ञानाच्या पातळींवर असलेल्या विद्येच्या कांही खुणा व साधना आजही पृथ्वीवर विशेषत: भारत भूमीवर संभाळल्या जाताहेत. ह्या विषयावर पुष्कळ संशोधन व्हावयाला हवे.

**कृष्णार्पणम् :**

पण, मुख्य प्रश्न आहे कीं सध्याच्या समाजाला ह्या पृथ्वीवर किंवा भारतातही किंवा हिंदू समाजालाही या धडपडीशी व प्रयत्नांशी काहीही 'सोयरसुतक' नाही अशी प्रभावी भोगसंस्कृती प्रचारांत आहे. अशी भौतिक सत्तालोभी संस्कृती अस्तित्वात व मस्तीत आहे !! तरीपण, आपल्यासारखे जाणकार वाचक ह्या विषयांत रस घेऊं इच्छितात, हे गृहीत धरून पुढच्या अंकात आपण ह्या विषयाशी संलग्न असा विचार मांडू या. भारतीय संस्कृतीची ही 'दिव्य कवच कुंडले' आहेत हे ध्यानात घ्या.

।। कृष्णार्पणमूअस्तु ।।

**यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट, सारस्वत बँकेशेजारी,
अग्यार लेन, ठाणे
Tel. 25368450
E mail;: yrsane@eth.net

•••

# पालकांच्या० अपेक्षांचे ओझे

*आपला पाल्य यंत्र नसून स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे त्याचे भान पालकांना कित्येकदा राहत नाही. त्यातून संघर्ष, वैफल्य यांना सुरुवात होते. या संदर्भातील हे विचार मंथन - संपादक*

दरवर्षी इ. १०वी / १२वी च्या निकालापूर्वी किंवा निकाल लागल्यानंतर आपल्याला काही दु:खद बातम्या वाचाव्या  लागतात. अमुक अमुक विद्यार्थ्याने गळाफास घेऊन आत्महत्या केली. अमुक अमुक विद्यार्थ्याचे कीटक नाशक पिऊन आत्महत्या केली. असे का घडते? अंतर्मुख होऊन आपण जर विचार केला, तर त्याचे एक कारण असे जाणवते की, त्या विद्यार्थ्यांचा अपक्षाभंग झालेला असतो, स्वत:च्या क्षमते संबंधी त्यांची एक घातक समजूत असते आणि त्यांनी अपेक्षित यश संपादन केलेले नसते. त्यातून त्यांना कमालीचे नैराश्य येते. त्यातून या आत्महत्या घडतात. शिवाय दुसरे महत्वाचे कारण म्हणजे त्यांच्या पालकांच्या त्यांच्याकडून ज्या अपेक्षा असतात, त्यांची पूर्तता त्यांनी केलेली नसते. त्यामुळे एक प्रकारचा अपराधी पणाची जाणीव त्यांच्या मनाला त्रासून टाकते आणि वैफल्याच्या तीव्र झटक्यापोटी ते पलायनवाद स्वीकारतात आणि मृत्यूला जवळ करतात.

याचा अर्थ पालकांनी आपल्या पाल्यांकडून काहीच अपेक्षा करायच्या नाहीत का? पालकांनी आपल्या मुलांची क्षमता, कुवत लक्षात घेऊन ह्या अपेक्षा कराव्यात. सध्याचा काळ हा स्पर्धेचा आहे. विशेषत: शहरी विभागांमध्ये चांगले गुण नसतील तर, चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळत नाही, हेही मान्य आहे. पुढे उच्च शिक्षण नसेल तर चांगल्या पगाराची नोकरी मिळणे कठीण हे ही मान्य. परंतु एकदम  १०वी/१२वी ला आपल्या पाल्याकडून अवास्तव अपेक्षा बाळगणे कितपत योग्य? त्याची तत्पूर्वीची शैक्षणिक कारकीर्द, संपादित यश यावर अपेक्षा आधारित असल्या पाहिजेत. ९वी मध्ये जेमतेम गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या मुलाकडून १०वी मध्ये तो विशेष प्रवीण्य मिळवील अशी अपेक्षा बाळगणे कितपत समुक्तिक आहे?

त्या मुलाने अथक परिश्रम केले, प्रयत्न केले तर त्याची गुणांची टक्केवारी फार तर १०/१५ टक्क्यांनी वाढेल.  नाही असे नाही. परंतु त्यालाही त्याची उपजत बुध्दी, स्मरणशक्ती याची मर्यादा असतेच की! त्या बेडकाच्या गोष्टीप्रमाणे बेडू कितीही फुगला तरी त्याचा बैल होईल का? हे पालकांनी लक्षात घ्यावयास हवे. कित्येकदा चांगले गुण मिळविलेले विद्यार्थी देखील आत्महत्या करताना दिसतात, याचे कारण त्यांनी मिळविलेल्या गुणांनी त्याच्या पालकांचे समाधान होणार नाही, हे ते पुरेपूर जाणून असतात. पालकांना असे वाटते की, आपला पाल्य हुषार आहे, त्याने गुणवत्ता यादीमध्ये यावयास हवे. सध्याच्या स्पर्धेच्या युगामध्ये प्रत्येकाच्या या इच्छेची पूर्ती होणे एकंदरीत कठीणच. दुसरी गोष्ट म्हणजे, पालक आपल्या पाल्याची तुलना आपल्या परिवारातील, मित्रमंडळीतील किंवा शेजाऱ्यांच्या मुलांशी करतात. हे अतिशय गैर आहे. प्रत्येक विद्यार्थी हे एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असते. त्याची क्षमता, कुवत, आवडनिवड वेगवेगळी असते. त्यामुळे ही तुलना करणे पालकांनी टाळावे हे उत्तम.

दुसरी एक अपेक्षा बरेचसे पालक आपल्या पाल्यांकडून बाळगतात, ती म्हणजे त्यांनी ज्या प्रकारचे शिक्षण घेतलेले असते, त्याच प्रकारचे शिक्षण घ्यावे. ते जो व्यवसाय करीत असतील, तोच व्यवसाय मुलांनी करावा. डॉक्टर पालकांना असे वाटते की आपल्या मुलांनी देखील डॉक्टर व्हावे आणि आपला चालू असलेला

व्यवसाय पुढे चालवावा. मग असे पालक मुलांना अट्टाहासाने विज्ञान शाखेकडे घालतात. मुलाने विज्ञान शाखेकडे प्रवेश घेण्यासाठी आवश्यक गुण मिळविलेले नसले तरी पैशाच्या जोरावर किंवा इतर मार्गांचा अवलंब करून प्रवेश मिळविला जातो. परंतु, आपल्या मुलाला विज्ञानाची आवड आहे का किंवा डॉक्टर बनण्याची त्याची महत्त्वाकांक्षा आहे का, या गोष्टी विचारात घेतल्या जात नाहीत.

विद्यार्थी त्याच्या आवडीच्या विषयामध्येच प्रावीण्य मिळवू शकतो, उच्च यश संपादन करू शकतो. त्यामुळे अशा पाल्याच्या मनावर त्याच्या पालकांच्या अपेक्षांचे सतत ओझे असते. एक प्रकारचे दडपण असते, त्यामुळे तो नावडीने तो अभ्यासक्रम कसाबसा पूर्ण करतो. कसाबसा डॉक्टर झाला तरी त्याची प्रॅक्टिस चालो वा न चालो, परंतु त्याला व्यावसायिक समाधान (Job Satisfaction) मिळत नाही हे निश्चित. तसेच काही पालक आपली अपूर्ण राहिलेली स्वप्ने पाल्यांकडून पूर्ण करून घेऊ पहातात. एखाद्या पालकाला विद्यार्थी दशेत असताना डॉक्टर व्हवयाची इच्छा असते, आवड असते. परंतु आर्थिक परिस्थितीमुळे किंवा इतर काही कारणामुळे त्याला ते शक्य झालेले नसते. अशा पालकांना वाटते, की अपूर्ण राहिलेली इच्छा आपल्या मुलांनी पूर्ण करावी. अभ्यासक्रम किंवा व्यवसाय निवडताना मुलाची क्षमता, कुवत, आवड ह्या गोष्टी लक्षात घेणे अत्यंत गरजेचे आहे. उगाच आपल्या अपेक्षांचे किंवा आपल्या स्वप्न पूर्तीचे ओझे मुलांवर लादू नये.

शिक्षण म्हणचे मुलांचा सर्वांगीण विकास (All round development) हा आजकाल परवलीचा शब्द झालेला आहे. मुलांनी केवळ अभ्यासामध्ये प्रगती करून चालणार नाही. ती वाट एकांगी असेल. मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास व्हायला हवा. तरच विद्यार्थी त्याच्या भावी जीवनामध्ये सध्याच्या काळामध्ये टिकाव धरू शकेल. त्यामुळे पालकांना असे वाटते की, आपल्या मुलांनी कला, क्रीडा सर्व क्षेत्रात प्रावीण्य संपादन करावे, पारंगत व्हावे, मग ते आपल्या पाल्यांना पेटी, तबल्याच्या क्लासला घालतात. गायन, नृत्य, कराटे इ. क्लासेसना घालतात आणि विद्यार्थ्यांची धावपळ सुरू होते. आजकाल बहुसंख्य विद्यार्थी अभ्यासासाठी क्लासेसना जात असतातच. त्यात ह्या क्लासासची भर. विद्यर्थ्यांची वेळेचे व्यवस्थापन न जमल्यामुळे दमछाक होते आणि ते कायम पालकांच्या अपेक्षांच्या ओझ्याखाली, मानसिक दडपणाखाली वावरतात. त्यांचे बालपण, आनंदाचे दिवस कोमेजून जातात. विद्यार्थ्याने एखादा छंद जोपासायला किंवा एखाद्या कलेमध्ये किंवा क्रीडेमध्ये प्रावीण्य मिळवायला काहीच हरकत नाही. त्यातून त्याला आनंद मिळू द्या. परंतू प्रत्येक गोष्टीमध्ये त्याने पराकोटीचे प्रावीण्य, उच्च प्रतीकेच यश संपादन केले पाहिजे असा अट्टाहास का? प्रत्यक्षात होते काय, एक ना धड भाराभार चिंध्या. अष्टपैलू व्यक्तिमत्त्व हे फारच दुर्मिळ असते. ती गोष्ट सर्वांनाच साध्य नसते. त्यासाठी उपजत दैवी देणगी आणि कठोर परिश्रमांची जोडाच लागते. सुट्टीच्या कालावधीमध्ये अनेक शाळा आणि सामाजिक संस्था विविध प्रकारचे छंद वर्ग चालवतात. बरेचसे पालक आपल्या मुलांना ह्या छंद वर्गांना घालतात. त्यांना असे वाटते की, आपल्या पाल्याचा सुट्टीतील वेळ सत्कारणी लागेल. एखद्या छंद वर्गाला मुलांना घालायला काहीच हरकत नाही, परंतु अडकवून ठेवणे हा उद्देश नसावा. कारण त्यातून काहीच साध्य होत नाही. वेळ आणि पैशाचा अपव्यय दुसरे काय?

एकंदरींत, पालकांनी आपल्या अपेक्षांचे ओझे आपल्या पाल्यांवर टाकू नये हे निर्विवाद सुजपणाचे लक्षण आहे.

**श्री. प्रभाकर द. अरदकर**
सहशिक्षक, श्रीरंग विद्यालय,
ठाणे, (प.) ४००६०१.
६०४, टी., ऋतुपार्क, ठाणे (प.) ४००६०१.

पुस्तक परिचय

# सार्वकालिक जाणीवांचा वेध

मानवी जीवन संघर्षानी भरलेले आणि (भारलेलेही) असल्यामुळे इतिहासपूर्व काळापासूनच्या जीवन संघर्षाचा मागोवा घेत आपण मागे सरकत राहिलो तर काळाचे सांधे बदलले तरी संघर्षाचे सातत्य चालूच राहल्याचे दिसते. या संघर्षाची मुळे मानवी नातेसंबधात व त्यातही स्त्री-पुरुष संबधात असतात हे मात्त सततचे सत्य आहे. या सत्याचा चिंतनाचा ध्यास घेतला व त्यातील सूक्ष्मातिसूक्ष्म पदरांचे निरीक्षण केले तर असेही लक्षात येते की, या संघर्षातून अनेक नाट्यमय शक्यता सतत उमलत राहू शकतात. कारण संघर्ष हा नाटकाचा व त्यातील नाटयात्मकतेचा मूळ अर्थ असल्याने या संघर्षातून नाटक निमाण होते.

राजीव नाईक यांच्या 'सततची नाटक' या पुस्तकातील अनाहत, अखेरचे पर्व व जातक-नाटक या पार्श्वभूमीवर समजावून घेतली तर अधिक, नीटपणाचे समजतात. या पुस्तकात जोडलेल्या पुस्तीमध्ये जातक - नाटकाच्या संदर्भात आवरण नाट्य व आतंर नाट्य अशा दोन नाट्यशास्त्रातील संकल्पना आल्या आहेत व लेखकाचे त्यावर भाष्यही आहे. अशा या नाटकांतील या दोन संकल्पनांचा संदर्भ महत्त्वाचा आहे. पण त्याहून संहिता वाचतांना (प्रयोगाचा परिणाम हे परीक्षणाचे वेगळे परिणाम आहे ) या सातत्याचा वर्तमानाशी जोडला जाणारा संदर्भ हा अधिक विचार करायला लावेल असा आहे .

उदा. अनाहतच्या शेवटच्या पनात (२७ ते ३०) लोपामुदा अगस्ती याचे संवाद व अखेरीस यणारे सूत्रधाराचे समारोपात्मक स्वगत,अखेरचे पर्व मधील कलामीमासीका, समाजशास्त्र, इतिहासकार आणि महाभारतातील पत्राचे सदंर्भ आणि जातक -नाटक मधील यशोधरेच्या मनातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर (पृ.१२९) एका डायव्होर्सी स्त्रीचे येणारे स्वगत वाचल्यानंतर या मिथकांतील सततपणा (सांतत्य) आणि वर्तमानाशी त्याचा जुळनारा साधा हा संदर्भ मिथंकातील संघर्ष, सुंघर्षाकडे पहावयाचे दृष्टीकोन आणि त्यातून उभे राहीलेले नाटक या सर्वाकडे पाहण्याची वेगळी दृष्टी देते.

विरक्ती विरुध्द आसक्ती या मूळ संघर्षावरुन कोलाजप्रमाणे एकमेकात मिसळत व उलगडत जाणारे सदंर्भ हे अनाहतचे खास वैशिष्ट्य. या तीन तुकड्यांच्या शेवटचे सूत्रधाराचे मिथककथांचा हा अधुनिक अवतार असे सागणारे स्वगत तिन्ही नाटकाना समान सूत्रात आणणारे आहे. या संघर्षातून उमलत जाणाऱ्या अधुनिक अभिव्यक्तीतील आणखी एक खास उल्लेख करायलाच हवा. तो म्हणजे अंलकारिक वाटतील, काव्यात्मकतेकडे झुकतील पण जीवनावर (अर्थात कथेच्या संदर्भात ) अचूक भाष्य करतील अशी वाक्ये अशा वाक्यांची काही उदाहरणे -

(पृ.४२ - व्यास - एकलव्यास ) - तुझ्यासारखे अनेक असतात, ज्याना भोगावं लागतं त्यांनी न केलेल्या पापाचं फळ!

(पृ. ९० - कलावंत -व्यासांना) - एवढं रचलंत - काय एवढं सागितलंत मग शेवटी असे उदास , घायळ, पराजयी का भासता तुम्ही?

(पृ .१११ सीः ३ ) -'नाहीतरी कशानंही आपल्याला हवं तेवढेच घेतं माणूस.'

(पृ. १२५ (यशोधरा) - ती भूतकाळाची सभोगस्मृती विरली आणि या कारुण्य वर्तमानातला मी एक ठिपका आहे एवढीच जाणीव उरली.

या तीन मिथक नाटकाचा स्वतंत्रपणे विचार करता श्री. नाईक यांची भाषा, तिच्यात काव्यात्मक ओघ व प्रत्येक पात्राचे त्यांनी मनात बाळगलले बेअरिगं हे मुद्देही महत्वाचे आहेत. वास्तविक प्रत्येक नाट्यसंहितेची भषिकदृष्ट्या स्वतंत्र विचार केला जाण्याची एक गरज आहे. तशोधरा ता स्त्री व्यक्तीरेखेतून त्यानी व्यक्त कलेली आसक्ती, त्याग व त्या पार्श्र्वभूमीवर आजच्या घटस्पोटातील मनोगत हा कथाभाग फारच धरुन ठेवल असा झाला आहे. एकतर यातील स्त्री-पुरुषाच्यां सवांदातून सादर होणारी वातावरण निर्मिती, त्या वातावरणाच्या पार्श्वभूमीवर यशोधरेचे उलगडत जाणारे काव्य सदंर्भ आणि पैंसा या दुर्गाबाईच्या पुस्तकातील आसन्न मरण काळी राणी या मिथककथेचा असलेला सदंर्भ हे सर्वया संहितेला एक उंची गाठून देणारे घटक झाले आहेत.

महाभारतातील पात्रे वर्तमानाच्या सदंर्भात सांडून त्याच्यां नियतीची मीमासा करणारे मीमांसक हे अखेरचे पर्वचे वैशिष्ट्य आहे. मात्र या नाटकातील काही संवाद सुटसुटीत काव्यात्मक स्वरुपात अविष्कृत होण्याऐवजी उगाचच बोजड होत असतात.धड गद्य धड पद्य असा कोणताच घाट या संवादांनामग सापडेनासा होतो असेही काही जाणवते.

पुस्तीच्या शेवटच्या भागात बिन वास्तववादी पोषाख नाटकं काव्य नाटकाकडे झुकतात असे नाईक म्हणतात पण काव्य -नाटकात या दोन्ही घाटांचे तोल (आणि ताल) एकमेकात ज्या प्रभावीपणे गुंतता नाटके अँब्सर्डीटीकडे झुकतात की काय असे वाटते तोच 'चिरंतन संघर्षाची' थिम पुन्हा ठळक होत जाते.

सततची नाटकं राजीव नाईक
मौज प्रकाश , मुंबई
पृष्ठे१३८, मुल्य रु.८०/- फक्त
प्रा. मोहन पाठक, ठाणे

## फॉर्म - ४

वृत्तपत्र नोंदणी अधिनियम - ८ नुसार माहिती


| | | |
|---|---|---|
| **मासिकाचे नाव** | : | **व्ही.पी.एम्. दिशा** |
| **प्रसिद्धी काळ** | : | **मासिक** |
| **संपादक** | : | **डॉ. विजय बेडेकर**<br>**बेडेकर हॉस्पिटल, ठाणे - ४०० ६०२.** |
| **राष्ट्रीयत्व** | : | **भारतीय** |
| **मुद्रक** | : | **विलास सांगुर्डेकर,**<br>**परफेक्ट प्रिंटस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे.** |
| **प्रकाशक** | : | **कार्याध्यक्ष,**<br>**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.** |


*आपले लोकांस मानेना । लोकांचे आपणास मानेना*
*अवघा विकल्पाचि मना । समाधान कैचे - श्री रामदास स्वामी*

# परिसरवार्ता

*मंडळाच्या घटक संस्थातील वृत्त संकलन करणाऱ्या व्यक्तीचे नाव या अंकापासून देत आहोत. मंडळाच्या कार्यालयात पाठवल्या जाणाऱ्या वृत्तान्ताच्या शेवटी ते लिहिलेले असणे अपेक्षित आहे. वृत्तान्त महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवावेत - संपादक*

## डॉ. बेडेकर विद्यामंदिर माध्यमिक विभाग

✦ दिनांक १२ जाने. रोजी गडकरी रंगायतन येथे झालेल्या अभिनय स्पर्धेत इ. ६ ब मधील कु. श्रीहरी मुळगुंद यास अभिनयाचे उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

✦ शुक्रवार दि. १५ फेब्रु. रोजी इ. १० वी चा निरोप समारंभ व पारिजातक प्रकाशन सोहळा मंडळाचे कार्यवाह श्री. उत्तम जोशी, कोषाध्यक्ष श्री. मा. य. गोखले व सभासद श्री. अनिरुद्ध जोशी यांच्या उपस्थितीत पार पडला. निरोप समारंभासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून राज्य पुरस्कार प्राप्त, श्वास चित्रपटाच्या कथा लेखिका सौ. माधवी घारपुरे व पारिजातक प्रकाशनासाठी शाळेचा माजी विद्यार्थी व प्रसिद्ध हार्मोनियम वादक श्री. आदित्य ओक यांस आमंत्रित केले गेले.



**१० वी निरोप समारंभ माजी विद्यार्थी श्री. आदित्य ओक**

✦ ३ फेब्रु. रोजी श्रीरंग विद्यालय येथे आयोजित 'आंतरशालेय बुद्धिबळ' स्पर्धेत मानसी महाडीक (७ वी) व रसिका चिपळूणकर (८ ब) यांना अनुक्रमे ४ पैकी ३ व ७ पैकी ६ पॉईंटस मिळून विजयी झाल्या.

✦ १३ व १४ फेब्रुवारी रोजी वार्षिक चित्रकला व हस्तकला प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

✦ शनिवार दि. १६ फेब्रुवारी रोजी U.K. च्या १० शिक्षकांनी शाळेला भेट दिली. पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागांतील विद्यार्थी व शिक्षकांशी त्यांनी संवाद साधला.

✦ २० फेब्रुवारी रोजी इ. ६ वी स्काऊट / गाईड कॅम्प विद्यालंकार हॉल व २० व २१ फेब्रुवारी रोजी ७ वी ,८ वी निवासी कॅम्प 'हेगडे फार्म' कर्जत येथे संपन्न झाला.

✦ २६ फेब्रुवारी रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त सौ. सुमिता माने यांनी सावरकरांच्या चरित्राबद्दलची माहिती सांगितली. तुषार सावंत, मृदुला शेटे, हेमेश सावकार व श्रीहरी मुळगुंद यांनी सावरकरांच्या जीवनातील उल्लेखनीय प्रसंगांवरील कथा सांगितल्या.

✦ २७ फेब्रुवारी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस 'मराठी दिन' म्हणून साजरा करण्यात आला. सौ. सुमिता माने व सौ. साधना कारंडे-जोशी यांनी कार्यक्रमास मार्गदर्शन केले. इ. ६ वी, इ. ७ वी व इ. ८ वी तील विद्यार्थ्यांनी मराठी पाठ्यपुस्तकातील पाठांचे नाट्यरूपांतर सादर केले. तुषार सावंत इ. ६ वी अ याने कुसुमाग्रजांचे जीवनचरित्र व साहित्याविषयीचा थोडक्यात आढावा घेतला.

मुख्याध्यापिका सौ. कळमकर यांनी कुसुमाग्रजांचे गुण व आठवणी विद्यार्थ्यांना सांगितल्या.

✦ २८ फेब्रुवारी रोजी 'विज्ञान दिन' साजरा करण्यात आला. या दिवशी विज्ञान दिनाचे महत्त्व व शास्त्रज्ञांच्या कथा विद्यार्थ्यांनी सांगितल्या. मुख्याध्यापिका सौ. उषा कळमकर यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टी जोपासावी असे सांगितले.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा

✦ **ठाणे जिल्हा गणित प्रावीण्य परीक्षा २००७ -२००८ :**

| | इ. ५ वी | इ. ८ वी |
|---|---|---|
| परीक्षेला बसलेले एकूण विद्यार्थी | ३० | ०४ |
| उत्तीर्ण झालेले विद्यार्थी | २६ | ०४ |

| इ. | विशेष प्रावीण्य | प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | तृतीय श्रेणी |
|---|---|---|---|---|
| ५वी | ६ | ६ | ७ | ७ |
| ८वी | १ | २ | ० | १ |

प्रज्ञा परीक्षेसाठी निवड झालेले विद्यार्थी :

इ. ५ वी

१) सन्मय आघारकर
२) ओम बापट
३) ओंकार करंदीकर
४) आभा मुतालिक
५) इशा सामंत
६) परीता दानोले

इ. ८ वी:

१) कृणाल चौधरी

✦ **वार्षिकोत्सव २००७-२००८ :**

माध्यमिक विभागाचा वार्षिकोत्सव १८ डिसेंबर रोजी संपन्न झाला. आमच्या माजी विद्यार्थिनी सौ. सेजल कन्वर प्रमुख पाहुण्या होत्या. त्या व्यवसायाने वास्तुविशारद असून Disha Stadiodromia - an NGO for Women, children and youth च्या संस्थापक अध्यक्ष आहेत. कोल्हाटकर मॅडम यांनी पालकांचे स्वागत करुन प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर वार्षिक अहवालाचे वाचन केले. मंडळाचे ज्येष्ठ सभासद श्री. करंदीकरसरांनी कार्यक्रम यशस्वी होवो असे आशीर्वादरुप भाषण करून कार्यक्रमाची सुरुवात केली. शालेय आणि शालेतर गोष्टींमधे प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. वेगवेगळ्या संकल्पनांवर आधारित सांस्कृतिक आणि मनोरंजनपर कार्यक्रम सादर करण्यात आले.

इ. ५ वी - ६ वी : भारतीय संस्कृती

इ. ७ वी - ८ वी : ग्रह, तारे

इ. ९ वी : विविधतेतून एकता

✦ **क्रीडा दिन २००७ - २००८ :**

२४ डिसेंबर रोजी मावळी मंडळ क्रीडांगणावर क्रीडादिन साजरा करण्यात आला. इ. ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थांसाठी खालील स्पर्धा होत्या.

वैयक्तिक स्पर्धा - ६० मि., १५० मि., ३०० मि. धावणे स्पर्धा; उंच उडी, गोळा फेक

सांघिक स्पर्धा - रिले रेस, डॉज बॉल, लंगडी

✦ **आनंदमेळा २००७ - २००८ :**

२४ जानेवारी रोजी शाळेत आनंद मेळ्याचे आयोजन करण्यात आले. प्रत्येक वर्गाचे स्टॉल होते.

इ. ५ वी - ६ वी : विविध खेळ

इ. ७ वी - ९ वी : विविध खाद्य पदार्थ

तसेच स्काऊट, गाईड, इंटरॅक्ट क्लबचेही स्टॉल होते. काही पदार्थ विद्यार्थ्यांनी स्वत: केले होते. सर्व विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी आनंद मेळ्याचा आनंद घेतला.

**✦ स्काऊट गाईड जाम्बोरी २००७-२००८ :**

२५ डिसेंबर ते ३० डिसेंबर या काळात दिल्ली येथे पार पडलेल्या जाम्बोरीत आमच्या शाळेतील २८ बालवीर, वीरबाला आणि ४ शिक्षक सहभागी झाले होते. आमच्या विद्यार्थ्यांनी तेथील विविध स्पर्धांमध्ये भाग घेतला. बैद्धिक खेळ, युथ फोरम व पेट्रोल काऊन्सिल या खेळांमधे आमच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला व महाराष्ट्र राज्याला प्रथम क्रमांक मिळवून दिला. शेवटच्या दिवशी विद्यार्थ्यांसाठी स्थलदर्शनाचा कार्यक्रम होता.

**✦ २००७ - २००८ च्या बालवीर राज्य पुरस्काराचा १००% निकाल :**

खालील विद्यार्थी राज्य पुरस्कार २००७ - २००८ परीक्षेत उत्तीर्ण झाले.

१. अमोल वैद्य २. परेश ठाकूर ३. अखिलेश शितूत

४. चिन्मय पोटे ५. आदित्य वैद्य ६. अजिंक्य मोरे

७. श्रेयस भागवत

**✦ गणित ऑलिम्पियाड - फेब्रुवारी २००८ परीक्षा :**

IIT पवई आयोजित फेब्रुवारी २००८ मधे झालेल्या गणित ऑलिम्पियाड परीक्षेत कु. वृषाली प्रसादे हिला द्वितीय क्रमांक मिळाला.

**✦ महर्षी व्यास विद्या प्रतिष्ठान आयोजित 'अमरकोश पाठांतर स्पर्धा :**

मुंबईतील एकूण १४०७ स्पर्धकांनी या स्पर्धेत भाग घेतला. स्पर्धेचा अंतिम निर्णय :

प्रथम क्रमांक - मिताली शेट्टी

द्वितीय क्रमांक - सिद्धार्थ नंदी

तृतीय क्रमांक - आदिती कुलकर्णी

उत्तेजनार्थ - प्रणाली प्रधान, सिद्धी सुर्वे

✦ अर्थ फाऊंडेशन आयोजित ''कौन है यह क्रांतिकारी तारे?'' स्पर्धेत कु. नेहा बिलारे हिला प्रथम पारितोषिक मिळाले.

✦ नोबल शिक्षण संस्था आयोजित 'ठाणे प्रज्ञा शोध' परीक्षेत सन्मय आघारकर ह्यास १२ वा क्रमांक मिळाला.

✦ दीनदयाळ प्रेरणा केंद्र आयोजित वैयक्तिक गायन स्पर्धेत मधुरा जोशीला प्रथम क्रमांक मिळाला.

✦ शाळेचा निरोप समारंभ ५ फेब्रुवारी रोजी संपन्न झाला. मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हाटकर यांनी मनोगत व्यक्त केले व शुभेच्छा दिल्या. नवीन प्रथेप्रमाणे, निरोप समारंभाच्या ठरावीक भाषणांना फाटा देऊन संदीप परदेसी यांच्या मुलांच्या आवडीच्या जादू बरोबरच शब्दभ्रम आणि जगलींगचे खेळ ही होते. प्रत्यक्ष उदाहरणांतूनच मुलांना दिसून आले की, कुठल्याही गोष्टीत यश मिळवण्यासाठी महत्त्वाकांक्षा, मेहनत, सराव, एकाग्रता ह्या गोष्टी अत्यंत आवश्यक आहेत.

✦ ११ आणि १६ फेब्रुवारी रोजी **UK** तील काही शिक्षकांनी आमच्या शाळेच्या अध्यापन पद्धती, तसेच गणित आणि भूगोल प्रयोगशाळेत वापरण्यात येणारी तंत्रे जाणून घेण्यासाठी शाळेला भेट दिली. पाहुण्यांसाठी चित्रकला, हस्तकला आणि विज्ञान प्रदर्शन आयोजित केले होते. शिशुवर्ग, प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमही सादर केले.

- 'सकाळ' वर्तमानपत्र आयोजित संस्कार शिदोरी स्पर्धेत कु. भाग्यश्री फडके इ. ९ वी हिला चौथा क्रमांक मिळाला. तसेच रु. १०,०००/- चे रोख पारितोषिक मिळाले.

- दिल्ली येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय बाल - कला महोत्सवात इ. ८ वी तील विद्यार्थिनी सौम्या केणी आणि हेतवी मोटा यांना शास्त्रीय नृत्यस्पर्धेत चौथा क्रमांक मिळाला. हा महोत्सव नोव्हे. २००७ मधे पार पडला. सौम्या आणि हेतवी नृत्य सादर करण्यासाठी रशिया येथे जाणार आहेत.

## जोशी - बेडेकर महाविद्यालय

- दि. १४ जानेवारी रोजी वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा संपन्न झाला. या प्रसंगी ठाणे महापालिका आयुक्त जंत्रे यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.

- दि. १८ व १९ जानेवारी रोजी महाविद्यालयात तत्त्वज्ञान विभागातर्फे राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. चर्चासत्राचा विषय 'Indian Philosophy Its relevance in the 21st century.' असा होता. या प्रसंगी डॉ. सुब्रमण्यन् व न्यायमूर्ती श्रीकृष्ण हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. या चर्चासत्रात अनेक अभ्यासकांनी आपले शोधनिबंध सादर केले.

- दि.२९ जानेवारी रोजी 'स्टाफ ॲकॅडमी' तर्फे 'Ayurueda for Health, Prevention and Cure of diseases' या विषयावर डॉ. आर. के. मिश्रा यांचे व्याख्यान झाले. व्याख्यानानंतर त्यांनी शिक्षकांनी विचारलेल्या आयुर्वेदविषयक शंकांचे समाधान केले.

- दि. २ फेब्रुवारी रोजी लोकमत तसेच 'F. Tech Computers' तर्फे ठाणावाला मॅडम यांचे व्याख्यान कात्यायन सभागृहात झाले. नोकरीच्या मुलाखतीच्या वेळी कोणत्या बाबी लक्षात ठेवाव्यात, याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले.

- दि. २ फेब्रुवारी रोजी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शकुंतला सिंग यांनी सर्व प्राध्यापकांसाठी 'व्याससभा' हा नवीन उपक्रम सुरू केला. दर शनिवारी सर्व प्राध्यापकांनी एकत्र जमून एखाद्या विषयावर मुक्तपणे चर्चा करणे, असे व्याससभेचे साधारपणे स्वरूप आहे. पहिल्या कार्यक्रमात 'एकत्र तसेच स्वतंत्र कुटुंबपद्धती' - फायदे / तोटे' या विषयावर सर्वांनी चर्चा केली.

- दि. ४ फेब्रुवारी रोजी 'जोशी - बेडेकर प्लेसमेंट सेल' तर्फे वाणिज्य शाखेत स्नातक पदवी संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना नोकरीसंदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी 'T.C.S.' ह्या संस्थेने पुढाकार घेतला. जवळजवळ १५७ विद्यार्थ्यांनी लेखी परीक्षा दिली. त्यातून ८१ विद्यार्थ्यांना मुलाखतीसाठी निवडले गेले, ४८ विद्यार्थ्यांची निवड नोकरीकरिता केली गेली.

- दि. ८ फेब्रुवारी रोजी व्याससभेमध्ये 'Role of husband in the family' या विषयावर प्राध्यापकांनी चर्चा केली.

- दि. ९ फेब्रुवारी रोजी कला शाखेत स्नातक पदवी संपादन केलेल्या विद्यार्थ्यांसाठी 'करीअर काऊन्सेलिंग' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी सुप्रसिद्ध मनोविकारतज्ज्ञ डॉ. अजय सिंग यांनी यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांना अतिशय मौलिक मार्गदर्शन केले. अनेक माजी विद्यार्थ्यांनी आपापले अनुभव तसेच त्या त्या विषयात पदवी

संपादन करून निवडलेला व्यवसाय याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

(वृत्त संकलन - प्रा. मुग्धा कुलकर्णी)

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या तृतीय वर्षात शिकत असलेल्या कु. स्नेहल यशवंत सागवेकर हिला दिनांक १२ फेब्रुवारी रोजी आयोजित केलेल्या आंतरमहाविद्यालयीन टेकवोंडो स्पर्धेमध्ये रौप्य पदक मिळाले.

वृत्त संकलन - कादंबरी कादरेकर

## वि.प्र.मं.चे ठाणे महापालिका विधी महाविद्यालय, ठाणे

✦ **कायदा साक्षरता कार्यक्रम - अहवाल :**

तालुका विधी सेवा समिती, वसई आणि पंचायत समिती, वसई यांच्या संयुक्त विद्यमाने 'कायदा साक्षरता कार्यक्रम' मौजे - भाताणे, जिल्हा परिषद शाळा, वसई येथे रविवार दिनांक ३ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आला होता. विधी महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी होते, यावेळी पुढील व्याख्याने झाली.

१) श्री. विवेक जोशी ''स्त्री आणि मालमत्ता अधिकार'' (द्वितीय वर्ष एल.एल.बी.) विद्यार्थी प्रतिनिधील

२) सौ. रंजन जोशी ''फौजदारी प्रक्रिया संहिते अंतर्गत पोटगी आणि विवाह नोंदणी'' (अर्धवेळ प्राध्यापक)

३) श्री. आनंद कासले ''हुंडाबंदी, कौटुंबिक हिंसाचार कायदा, बहुपत्नीत्व -, इ.'' (पूर्णवेळ प्राध्यापक)



विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले आणि त्यात वेठबिगारी, आदिवासींवरील अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार, हुंडा इ. बाबत माहिती दिली.

प्रभारी प्राचार्य सौ. श्रीविद्या जयाकुमार यांनी महाविद्यालयातर्फे आयोजकांनी दिलेल्या समाजसेवेच्या संधीबाबत आभार मानले.

माननीय न्यायाधीश श्री. कनबरकर न्यायाधीश - १ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश वसई, माननीय न्यायाधीश श्री. मोरे, श्री. जाधव, श्री. फड, श्री. राहुल सरकाळे, वसई न्यायालय यांनी सुद्धा व्याख्याने दिली. सर्व न्यायाधीश मंडळी शिक्षकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या कार्याने प्रभावित झाली. न्यायाधीशांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करून शाबासकी दिली.

## वि.प्र.मं. चे तंत्रनिकेतन

### ✦ शैक्षणिक वर्षे २००७ - २००८ मधील स्नेहसंमेलन, 'पॉलिस्पार्क' व बक्षिस वितरण... एक वृत्तान्त :




**'पॉलिस्पार्क' कार्यक्रमात गीत सादर करताना.**

डिसेबंर महिना आला की वेध लागतात स्नेहसंमेलनाचे २००७ - २००८ हे वर्षे वि.प्र.मंडळाचे तंत्रनिकेतनचे रौप्य महोत्सवी वर्षे. दरवर्षाप्रमाणे याही वर्षी वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षिस वितरण समारंभ २४ डिसेंबर ते २९ डिसेंबर या कालावधीत पार पडला.'poly -spark' हा सांस्कृतिक कार्यक्रम तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांनी मेहनत घेऊन पार पाडला. 'पॉलिस्पार्क' हा सांस्कृतिक कार्यक्रम विद्यार्थ्यांमधील कलागुणांना तसेच बुद्धिमत्तेला वाव देणारा कार्यक्रम आहे.

कार्यक्रमाची तयारी म्हणून सांस्कृतिक समितीने १४ डिसेंबर रोजी एका सभेचे आयोजन केले. त्यात अनेक events चा आढावा घेतला व प्रत्येक events साठी इनचार्ज नेमले व त्यांना त्या त्या events पार पाडण्याची जबाबदारी सोपविली. कार्यक्रमाचे जनरल सेक्रेटरी म्हणून गौरव महाशब्दे (SYEPS) या विद्यार्थ्याची निवड करण्यात आली व कु. शुभांगी सालीनकर (SYCO) हिने सहाय्यक म्हणून काम पाहिले.

२४ डिसेंबर रोजी कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. त्यानंतर दुपारच्या वेळेस 'Friendship day'चे आयोजन केले. हा कार्यक्रम तंत्रनिकेतनच्या A.V. रूममध्ये पार पडला. २६ डिसेंबर रोजी odd day आणि chocolate day ही स्पर्धा पार पडली. दुपारनंतर रांगोळी व मेहंदी स्पर्धा भरविण्यात आली होती. त्यातच T-shirt पेटिंग स्पर्धा पहिल्यांदाच घेण्यात आली.

२७ डिसेंबर रोजी 'Tradirtional day' साजरा करण्यात आला. 'अंताक्षरी' स्पर्धेचे आयोजन P -5 या क्लासरुममध्ये केले होते. 'अंताक्षरी' या कार्यक्रमाला उत्सवामध्ये चांगलाच प्रतिसाद मिळाला.

सर्वात महत्त्वाची स्पर्धा ही २८ डिसेंबर व २९ डिसेंबर रोजी झाली. २८ डिसेंबरला Talent Hunt ही स्पर्धा झाली. ही स्पर्धा दोन भागांमध्ये विभागली होती. या स्पर्धेस खूपच प्रतिसाद मिळाला. दरम्यान नृत्य स्पर्धा पार पडली. त्यामध्ये एकूण आठ सोलो पाच ग्रुप ड्रान्स झाले. दुपार नंतर Fun Fair चे आयोजन केले होते. त्यामध्ये विद्यार्थ्यानी वेगवेगळ्या खाद्य पदार्थाचे स्टॉल लावले होते. तसेच काही खेळांचेही स्टॉल्स होते. दरम्यान Treasure Hunt व visual spark ह्या दोन स्पर्धा प्रथमच घेण्यात आल्या.

२९ डिसेंबर रोजी Mr. & Miss poly-spark ची निवड Tieking आणि Saree Queen स्पर्धेमधून केली गेली.

शैक्षणिक व इतर परितोषिक समारंभ दुपारच्या सत्रात पार पडला. बक्षिस समारंभासाठी श्रीयुत एस. व्ही. मोहिते, (DCP, Crime Branch, Mumbai) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते यशस्वी व गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. प्रसंगी प्रमुख पाहूणे श्री. एस. व्ही. मोहिते, प्राचार्य दि. कृ. नायक व माजी प्राचार्य मुजुमदार सर यांची भाषणे झाली.

''संगीत संध्या'' हा गाण्यावर आधारित कार्यक्रम 'वादळवाट' मालिका फेम विघ्नेश जोशी आणि त्यांच्या सहकाऱ्यांसह तंत्रनिकेतनातील विद्यार्थ्यांनी गाणी गाऊन साजरा केला. सर्वात जास्त events असणाऱ्या विभागास 'चॅम्पियन ट्रॉफी' देण्यात आली. २००७-०८ ची चॅम्पियन ट्रॉफी इर्न्फेमेशन टेक्नालॉजी या विभागाकडे गेली. रनरअप म्हणून कॉम्प्युटर विभाग होता.

२००७ - २००८ चे वार्षिक स्नेहसंमेलन हे प्रा. ऋचा कोऱ्हाळे व गौतमी पुजारी यांच्या नेतृत्त्वाखाली व प्राचार्य दि. कृ. नायक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सांस्कृतिक समितीचे प्रमुख व विद्यार्थी प्रतिनिधी इत्यादींने सहकार्य केले. या सर्वाचे सांस्कृतिक कार्यक्रम समितीच्या प्रमुख ऋचा कोऱ्हाळे यांनी आभार मानले.

वृत्त संकलन - श्री. चंद्रकांत शिंगाडे

### पुढील वर्षी आयोजित होणारा Biometrix, RFID and Emerging Technologies For Automatic identification या राष्ट्रीय परिषदेबद्दल :

वि.प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतन, ठाणे ही तांत्रिक शिक्षण देणारी प्रमुख शैक्षणिक संस्था असून या तंत्रनिकेतनातर्फे पुढील वर्षी एका राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात येत आहे. ही परिषद शुक्रवार, ९ जाने. २००९ व शनिवार १० जानेवारी २००९ या दिवशी बाजीराव पेशवे सभागृह, महाविद्यालय परिसर, चेंदणी बंदर रोड, ठाणे (महाराष्ट्र) - ४०० ६०१ येथे आयोजित केली आहे. परिषदेचा विषय Biometrix, RFID and Emerging Technologies For Automatic identification असा आहे. परिषदेचे प्रमुख प्रा. दि. कृ. नायक, प्राचार्य वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन ठाणे., असून संघटक सचिव म्हणून प्रा. सौ. सुहासिनी शुक्ला आहेत.

संपर्कासाठी सबंधित इच्छुकांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा -

वि.प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतन, ठाणे
'ज्ञानद्वीप' ठाणे महाविद्यालय परिसर
ठाणे (पश्चिम) - ४०० ६०१
दूरध्वनी क्रमांक : ०२२-२५३६४४९४
फॅक्स क्रमांक : ०२२-२५३३९८७२
Website : www.vpmthane.org.

दिशा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

**संपादकीय-भाषाभिवृद्धी आणि मनोदास्य मुखपृष्ठावरून**

अनुभवांमधून होणारी वाढ आज आपण खुंटवून टाकत आहोत. इंग्रजाळलेले मराठी रूढ करण्याचा मूर्ख प्रयत्न, ही भाषिक उसनवारी मराठीला वांझ बनवू पाहात आहे. इंग्रजीच्या अनावश्यक, धेडगुजरी वापराने आमची भाषा आम्हीच डागळत आहोत.

जे मराठी भाषेबाबत आहे तेच थोड्याफार फरकाने अभिजात परंपरा असणाऱ्या भारतीय भाषांबाबत आहे. भाषा हा 'महत्त्वाचा विषय' नाही, असे मनावर ठसवणारी शिक्षणपद्धती, अभ्यासक्रम हे ही याला जबाबदार आहेत. यासाठी बेगडी अभिनिवेशापेक्षा सार्थ अशा अभिमानाची गरज आहे. इतर भाषांबद्दल अनाठायी द्वेष नसावा हे खरे; पण त्यांचा अर्थ मातृभाषेची उपेक्षा करावी असा होत नाही.

मराठी भाषा टिकणार का, मराठीला आता भवितव्य नाही अशा स्वरूपाचे सूर आळवले जातात. पण, (मराठीच्या) ''विकासात वेगवेगळ्या क्षेत्रांतले आम्ही, द्यावे तितके लक्ष घालत नाही हे भाषेच्या सद्याच्या अवस्थेचे एक कारण आहे.'' (कै. प्रा. केशव मेश्राम, अध्यक्ष, ७८ वे साहित्य संमेलन २००५, नाशिक) हे निरीक्षण लक्षात घ्यायला हवे. दूरदर्शन, अंतरजाल (इंटरनेट) आणि वृत्तपत्रांसारख्या माध्यमांत भाषेचा वापर करणाऱ्या संबंधितांनी त्यासाठी जबाबदारीने भाषा वापरायला हवी. या माध्यमांतील ज्यांना मराठी भाषी म्हणून ओळखले जाते ती माणसे ज्ञानभाषा मराठीवर अनेक 'व्यवहार्य' (!) कारणांच्या सबबी सांगत अविश्वास दाखवतात. त्यामुळे भाषिक मनोदास्य वाढते, त्याचे पांगळे समर्थन करण्याची सवय लागते.

याचा विपरीत परिणाम मराठीच्या ज्ञानभाषा म्हणून शक्य असलेल्या विकासावर होत आहे. मराठी भाषकांनी ही अनास्था, मनोदास्य सोडून मराठीचा जाणीवपूर्वक वापर केला, तिची माध्यमांमधून होणारी गळचेपी थांबवली, परिभाषिक विकासाकडे लक्ष पुरवले तर मराठीत अमर्याद क्षमता आहेत. मराठीचे ऐतिहासिक भाषाशास्त्र, भाषाशास्त्रीय विकासातील टप्पे, मध्ययुगातील व १८१८ नंतरच्या काळात झालेला तिचा विकास पाहता हे सहज पटण्यासारखे आहे.


या पार्श्वभूमीवर एक गोष्ट मांडावी वाटते. ती म्हणजे भाषेची समृद्धी उसनवारीने होते, हा गैरसमज. त्यासाठी इंग्रजीचे उदाहरण दिले जाते. इंग्रजीची आजची परिस्थिती ही तिच्यात उपलब्ध केल्या गेलेल्या प्रवाही विज्ञान परिभाषेमुळे आहे. अर्थात एक गोष्ट कटाक्षाने लक्षात ठेवायला हवी की अमेरिका व इंग्लंड या दोन महान सतांपलीकडे इंग्रजीचा प्रभाव हा त्यांच्या आधीच्या वसाहतींवर आढळून येतो. या पलीकडील जग इंग्रजीवर अवलंबून नाही. हे आपण लक्षात घेत नाही. त्यामुळे आपले समर्थन कमकुवत मानसिकतेचे उदाहरण आहे.

मराठी परिभाषा निर्माण करण्याची सुतराम इच्छा समाजात नाही. असा प्रयत्न करणारांचे प्रयत्न हास्यास्पद ठरवले जातात. शिक्षण हे मानवाच्या ज्ञानवृद्धीचे साधन आहे ही सर्वमान्य बाब आहे. शिक्षण म्हणजे सराव. परिभाषेचा सराव केल्याशिवाय शब्द अंगवळणी पडत नाहीत. एरवी परिवर्तनाचा आक्रोश करणारी मंडळी या सीमेवर पांगळी झालेली दिसतात. याचे कारण समाज विघटन करू शकणाऱ्या सिद्धांतवादात आहे असे विभाजन धोकादायक आहे.

हाच प्रकार बोली भाषेचा आहे. 'दर कोसावर भाषा बदलते', यासारखी वचने, समर्थन करताना वापरली जातात. बोली भाषेचे संशोधन होणे आवश्यक आहे यात वाद नाही. पण ती प्रमाण भाषा होऊ शकत नाही. प्रमाण भाषा नियम आणि व्याकरणबद्ध असावीच लागते, तरच ती भौगोलिक परिक्षेत्रात विज्ञान व साहित्यासाठी वापरता येते.

वरील विश्लेषणाच्या पार्श्वभूमीवर अभिनिवेश न बाळगता भाषिक विकास होणे किती महत्त्वाचे आहे ते लक्षात येते.

***या महिन्यात १ तारखेला दासनवमी आहे.  त्या निमित्त थोर राष्ट्रसंत श्री समर्थ रामदासस्वामींचे विनम्र स्मरण***



***दि २३ मार्च संत श्री समर्थ रामदासांचे समकालिन थोर संत तुकाराम महाराजांच्या निर्वाणाची या दिवशी तिथ आहे. तुकाराम बीजीच्या निमिताने या  संताचे सादर स्मरण***



**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**


## विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

# थोरले बाजीराव पेशवे सभागृह

✰ ३०० आसनांची व्यवस्था

✰ आधुनिक दृकश्राव्य यंत्रणा

✰ उपाहाराची व्यवस्था

✰ वहाने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

✰ प्रसन्न वातावरण

संपर्क
कार्यवाह,
विद्या प्रसारक मंडळ,
नौपाडा, ठाणे ४०० ६०२.
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिंटर्स, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.